अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. १६ सप्टेंबर २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३४८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## बांगलादेशचा भारतावर ६ धावांनी विजय, शुभमन गिलचे शतक व्यर्थ

**कोलंबो :** आशिया चषकातील सुपर ४ फेरीतील अखेरच्या सामन्यात भारतीय संघाला सहा धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. अखेरच्या षटकापर्यंत रंगलेल्या सामन्यात बांगलादेश संघाने भारताचा सहा धावांनी पराभव केला. बांगलादेशने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघ २५९ धावांत संपुष्टात आला. बांगलादेशने भारतासमोर २६६ धावांचे आव्हान ठेवले होते. प्रत्युत्तरदाखल भारतीय संघाने २५९ धावांपर्यंत मजल मारली. शुभमन गिल याची शतकी खेळी व्यर्थ गेली.

शुभमन गिल याचे शतक आणि अक्षर पटेल याची जिगराज ४२ धावांची खेळी वगळता इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. गिल-अक्षरचा अपवाद वगळता भारताच्या इतर एकाही फलंदाजाला ३० धावसंख्या पार करता आली नाही. रोहित शर्मा, केएल राहुल, सुर्यकुमार, इशान किशन आणि रविंद्र जाडेजा हे फलंदाज अपयशी ठरली. एका बाजूला विकेट पडत असताना शुभमन गिल याने दुसऱ्या बाजूला संयमी फलंदाजी केली. शुभमन गिल याने १२१ धावांची दमदार खेळी केली. गिल याने पाच षठकार आणि आठ चौकार ठोकले. गिल याचा अपवाद वगळता अक्षर पटेल याने ४२ धावांची खेळी केली. अक्षर पटेल याने दोन षटकार आणि तीन चौकार ठोकले. सूर्यकुमार यादव आणि केएल राहुल यांना चांगली सुरुवत मिळाली, पण मोठी खेळी करता आली नाही.




# काका-पुतण्याचे जमेना कार्यकर्त्यांना करमेना

## मेजर बैठकीला मारली 'दांडी', मनोमिलनाची झाली 'कोंडी'

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरद पवार आणि पक्षातून बाहेर पडत सत्तेत गेलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यातील दुरावा आणि एकमेकांचे तोंड न पाहाण्याचा प्रकार कार्यकर्त्यांना सहन होत नाहीय. पक्षाच्या भल्यासाठी काका-पुतणे यांनी एक व्हावे, अशी कार्यकर्त्यांची मनोमन इच्छा आहे, पण त्यासाठी काळ आणि वेळ जुळून येत नाही. शुक्रवारी एकत्र येण्याचा योग आला होता परंतु काळानेच त्यात मिठाचा खडा टाकला की काय कोणास ठाऊक?. अजितदादांनी चेहऱ्यावर रूसवा घेत एका महत्वाच्या बैठकीला दांडी मारली त्यामुळे मनोमिलनाची पुन्हा कोंडी झाली. त्यामुळे राज्यातील कार्यकर्त्यांची घोर निराशा झाली.**

झाले असे की, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटसंस्थेची शुक्रवारी पुण्यात महत्वाची बैठक होती. शरद पवार हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. कार्यकारी मंडळाचे सदस्य या नात्याने अजितदादा यांचीही उपस्थिती अनिवार्य होती. त्यांच्या उपस्थितीची सगळ्यांनाच प्रतिक्षा होती. या बैठकीला जयंत पाटील, दिलीप वळसे पाटील तसेच अन्य संचालक मंडळ उपस्थित होते.

साऱ्यांच्या नजरा व्यासपीठाकडे लागल्या होत्या. अजितदादांची एन्ट्री केव्हा होणार? याचीच बैठकीत उत्सुकता होती परंतु घडले वेगळेच. या बैठकीला दांडी मारून ते खासगी कामानिमित्त दौंडकडे निघून गेले. त्यामुळे शरद पवार यांचे स्वागत राज्य सरकारमधील मंत्री दिलीप वळसे पाटील यांना करावे लागले. सर्वोच्च न्यायालयात पक्ष आणि चिन्हाचा वाद सुरू असताना अजितदादांनी शरद पवार यांच्यासमोर येणे टाळले का? अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### मनात नेमके काय आहे?

या बैठकीसाठी शरद पवार आणि अजितदादा हे एकत्र येतील, अशी शक्यता होती. परंतु या बैठकीला अजितदादांनी अनुपस्थिती लावली. पुण्यात असूनही त्यांनी बैठकीला दांडी मारली आणि खासगी कामासाठी दौंडला गेले. गेल्या वेळीही संचालक मंडळाच्या बैठकीला अनुपस्थिती लावून अजितदादांनी शरद पवार यांची गुप्त भेट घेतली होती. उद्योगपती अतुल चोरडिया यांच्या पुण्यातील निवासस्थानी ही गुप्त भेट झालेली होती. अजितदादांनी बैठकीला दांडी मारून दौंडकडे गेल्याने दादांच्या मनात नेमके काय आहे? असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. एकंदरित शरद पवार यांच्यासमोर जाण्याचे अजितदादांनी सलग दुसऱ्यांदा टाळले आहे.

### कोणत्या मंत्र्यांकडे कोणते जिल्हे

- अजित पवार : पुणे, सातारा, सांगली व सोलापूर
- प्रफुल पटेल : भंडारा, गोंदिया, वर्धा, अमरावती व नागपूर
- छगन भुजबळ : नाशिक, मुंबई शहर व मुंबई उपनगरे
- दिलीप वळसे पाटील : अकोला, वाशीम, छत्रपती संभाजीनगर व बुलडाणा
- हसन मुश्रीफ : कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि नगर
- धनंजय मुंडे : बीड, परभणी, नांदेड, व जालना
- संजय बनसोडे : हिंगोली, लातूर, धाराशिव
- आदिती तटकरे : रायगड, रत्नागिरी, ठाणे, व पालघर
- अनिल पाटील : जळगाव, धुळे व नंदुरबार
- धर्मरावबाबा आत्राम : गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ

### मंत्र्यांच्या कामांचे ऑडिट...

अजितदादांनी आपल्या गटासाठी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस अस्तित्वात येऊन उणेपुरे दोन महिने झाले. मात्र, मंत्र्यांचे पक्षसंघटनेकडे दुर्लक्ष होत असल्याने बैठकीत पक्षश्रेष्ठींनी नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात येते. पक्ष संघटनेसाठी नेमून दिलेल्या जिल्ह्यात मंत्री जात नसल्याने बैठकीत नाराजीचा सूर उमटला. त्यातूनच आता मंत्र्यांचे प्रगतिपुस्तक काढण्याचा निर्णय अजितदादा गटाने घेतला आहे. देवगिरी निवास स्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्वपूर्ण बैठक पार पडली. त्यात हा निर्णय घेण्यात आला.




### मनोमिलनाची आस...

राज्यात होणाऱ्या अनेक कार्यक्रमांमध्ये शरद पवार गट आणि अजितदादा गटाच्या नेत्यांकडून आरोप- प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे. तर शरद पवार आणि अजित पवार यांनी एकत्रित यावे, अशी भावना अनेक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते बोलावून दाखवत आहे. या बैठक ठिकाणाच्या बाहेर राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक सरचिटणीस अजित घुले यांनी, 'लहान तोंडी आज मोठा घास- महाराष्ट्राला लागली आपल्या मनोमिलनाची आस'! आदरणीय शरदचंद्रजी पवारसाहेब आणि नामदार अजितदादा पवारसाहेब अशा आशयाचा फ्लेक्स लावला हा फ्लेक्स सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

## उजनी धरणातून १८ सप्टेंबरपासून सोलापूरसाठी पाणी सोडणार



सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारा औज बंधारा कोरडा पडला आहे. अलमट्टी धरणातून पाणी घेण्याचा नियोजन फसल्यामुळे आता सोलापूर शहरासाठी १८ सप्टेंबर पासून उजनी धरणातून पाणी सोडले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

सोलापूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या औज बंधाऱ्यांत १.२० मिटर चिंचिपुर बंधाऱ्यांत १.३० मिटर तर टाकळी येथे ९ फूट पाणी साठा आहे. हा पाणी साठा सात ते आठ दिवस पुरणार आहे. त्यामुळे उजनी धरणातून पाणी सोडण्याची मागणी पालिका प्रशासनाकडून जिल्हाप्रशसाकडे करण्यात आली होती. यावर जिल्हानियोजन समितीमध्ये चर्चाही झाली होती. नियोजन समितीच्या सदस्यांनी औज बंधाऱ्यात कर्नाटकातील अलमट्टी धरणातून पाणी घेता येते, यापूर्वी घेतले आहे. तेथून पाणी घेण्याची मागणी केली पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करण्याचे अश्वासन दिले होते.

मात्र हा बाबात पाठपुरवा करण्यात आला. मात्र अलमट्टीचे तून पाणी घेण्याचे नियोजन फेल गेल्यामुळे आता उजनी धरणातून पाणी सोडण्याचे नियोजन पाटबंधारे विभागाकडून करण्यात आले आहे. त्यानुसार १८ सप्टेंबर पासून भीमा नदीच्या माध्यमातून औज बंधाऱ्यांत पाणी सोडले जाणार आहे. उजनीतून सोडलेले पाणी औज बंधाऱ्यांत दहा दिवसार पोहचणार आहे.या पाण्यातून औज आणि चिंचपुर बंधारा चार मिटर पर्यंत भरुन घेतला जाणार आहे. या मुळे सोलापूरचा दोन महिन्याचा पाणी प्रश्न निकाली निघणार आहे.

### आठ दिवसात सेतूचा ठेका

आठ दिवसात सेतूचा ठेका निश्चित होणार जिल्ह्यातील अकरा ठिकाणी सेतू सुविधा केंद्र चालविण्यासाठी सात ठेकेदारांकडून निवीदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी पाच ठेकेदार पात्र ठरले असून पात्र ठरलेल्या ठेकेदारांची कागदपत्रे तपासून आठ दिवसात सेतू चालविण्यासाठी ठेकेदाराची निवड करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

## हैदराबाद संस्थानमधील जिल्ह्यातील ५२ गावांचा शोध घेऊन कागदपत्रांची तपासणी होणार : जिल्हाधिकारी



सुराज्य/सोलापूर

हैदराबाद संस्थानामधील ५२ गावांचा जिल्ह्यात समावेश आहे. मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा अध्यादेश निघाल्यानंतर याच न्यायाने सोलापूर जिल्ह्यातील मुक्तीपूर्व मराठवाड्यातील गावाचा शोध जिल्हा प्रशासनाने सुरू केला आहे. या गावातील कुणबी मराठा प्रमाणपत्रासाठी गॅजेट आणि कागदपत्राची तपासणी केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली

मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणानंतर मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महसुली व कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी न्यायमूर्ती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाड्यातील आठ जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांची अभ्यास समिती नेमण्यात आली आहे. या समितीत सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश करावा तसेच जिल्ह्यातील तत्कालीन मराठवाड्यातील ५२ गावांतील मराठा समाजाला न्याय मिळावा, आशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. आता धाराशिव जिल्हा प्रशासन व सोलापूर जिल्हा प्रशासनाने या ५२ गावांचा शोध सुरू केला आहे. अधिकृत गॅझेट व त्यातील ५२ गावांची यादी मिळाल्यानंतर या गावातील महसुली व शैक्षणिक कागदपत्रे तपसाताच संबंधित ५२ गावांतील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तत्कालीन मराठवाड्यातील ही ५२ गावे माढा, मोहोळ, बार्शी व उत्तर सोलापूर तालुक्यात विभागलेली असून पूर्वीच्या तुळजापूर तालुक्यात यांचा समावेश होता.

माढा तालुक्यातील जामगाव येथे रझाकाराच्या जुलमाविरुद्ध बंड करून मुक्तापूर स्वराज्य स्थापन करण्यात आले होते. या सोलापूर जिल्ह्यातील ५२ गावांचा सहा महिने कारभार जामगावकर-पाटील पाटील यांच्या वाड्यातून सुरू होता. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा मुक्तिबरोबर ही गावे भारतात आली. होती.

माढा येथील जामगाव येथे जामगावकर पाटील यांच्या विद्यमान वंशज सुहास पाटील हे दर वर्षी १७ सप्टेंबरला ध्वजवंदन करून मुक्तिदिन साजरा करतात. यंदा रविवारी १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वा. इतिहास संशोधक प्रा. सतीश कदम यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे.

## महावितरणचा कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

सुराज्य/पंढरपूर

शहरातील एका दुकानदारांकडून ५ हजार रुपयांची लाच घेणाऱ्या पंढरपुरातील महावितरण कार्यालयातील सहाय्यक लेखापालास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

तक्रारदार यांचे किराणा मालाचे दुकान आहे. त्या दुकानांमध्ये नवीन वीज मीटर घेण्याकरिता तसेच तक्रारदार यांनी शेजारचा दुकानातून लाईट कनेक्शन घेतले म्हणून त्याच्यावर ७० हजार रुपयांचा दंड आकारलेला आहे. तो दंड माफ करण्याकरिता पंढरपूर महावितरण विभागाच्या कार्यालयातील लेखापाल श्रीकांत भीमराव आवाड (वय ३८, रा. जुना विडीघरकुल, सोलापूर) यांनी तक्रारदारांकडे सुरुवातीस पंधरा हजार रुपयाची मागणी केली ५ हजार रुपये लाच रक्कम स्वीकारताना महावितरण कार्यालय पंढरपूर ग्रामीण-२ या कार्यालयाच्या आवारात स्वीकारताना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. ही कारवाई पुणे परिक्षेत्र ला.प्र.वि. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरीक्त पोलीस अधिक्षक शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे, पो.शि. रियाज शेख, दिनेश माने, मंगेश कांबळे, चालक पो.हवा दिवेकर यांनी केली आहे.



### सांगोला येथे पाणी टंचाई विषयक आढावा बैठक

## पाण्याच्या नियोजनात चूक झाली तर अधिकाऱ्यांना माफी नाही: खा. निंबाळकर

सुराज्य/सांगोला



पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ हे नैसर्गिक संकट असून पाणी जपून नाही वापरले तर मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. पावसाची परिस्थीती यावर्षी गंभीर असल्यामुळे मागेल त्या गावाला टँकर द्या पूर्ण क्षमतेने फाटे चालवा, टेल टू हेड असेच पाण्याचे नियोजन करा, फाटे फोडतात त्याच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा. सर्व क्षेत्र भिजत नाही तो पर्यंत पाणी बंद करू देणार नाही. असा इशारा देत पाण्याच्या नियोजनात चूक झाली तर अधिकाऱ्यांना माफ करणार नाही असा सज्जड दम खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी दिला.

अपुऱ्या पर्जन्यामुळे सांगोल्यासह सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यात पाण्याची भीषण टंचाई आहे. पाणी टंचाई विषयक विविध बाबींवर चर्चा करणेसाठी बचत भवन, पंचायत समिती, सांगोला येथे पाणी टंचाई विषयक आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी खासदार रणजित सिंह नाईक निबाळकर बोलत होते. यावेळी चाऱ्या संदर्भात टंचाई जाहीर करुनच पालकमंत्री यांच्या समवेत बैठक घेणार असल्याचे सांगत ७२ तासामध्ये पाण्याचे नियोजन करुन पाण्याचे वेळापत्रक शेतकऱ्यांपुढे ठेवा अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

आमदार शहाजीबापू यांनी टंचाई गावातील प्रस्ताव पाठवून द्या, कोणतेही काम तटणार नाही याची दक्षता घ्या. कोरडा संदर्भात जे नियोजन केले आहे त्यात बदल करू नका. सांगोला शहराला २० तारखेपासून पाणीपुरवठा सुरळीत होईल असे सांगितले. यावेळी प्रणव परिचारक यांनी अधिकारी व लोकप्रतिनिधी मध्ये समन्वय नसल्यामुळे नेहमी प्रमाणे यावर्षी रोटेशन चालले नाही.अधिकारी व लोकप्रतिनिधी यांना समन्वय ठेवून पाणी वाटप करावे असे आवाहन करत २७० क्यूसेस ने पाणी सोडा अशी मागणी यावेळी लावून धरली.

बैठकिस चेतनसिंह केदार - सावंत, खंडू सातपुते, अभिषेक कांबळे, संभाजी अलादर, शिवाजी गायकवाड, बाळासाहेब काटकर, माऊली तेली, अस्मिर तांबोळी, राजू मगर, सूरज बनसोडे, नवनाथ पवार, नागेश जोशी, दीपक खटकाळे डॉ.बाबर, यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी, राजकिय पक्षाचे पदाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक उपस्थिती होते. यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, निरा उजवा कालवा, टेभू योजना, म्हैसाळ योजनेचा आढावा सादर करण्यात आला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आपल्याकडेही ऑरेंज अलर्ट कधी मिळेल?


कल्याण
567-81-560

मुंबई
780-59-270


## सोलापूर, माढ्यासह ४८ जागा स्वराज्य पक्ष स्वबळावर लढवणार

### छत्रपती संभाजीराजेंची घोषणा

सुराज्य/पंढरपूर

**मराठा आरक्षणावरून संभाजीराजे छत्रपती यांनी मुख्यमंत्री कनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना उपरोधिकपणे टोला लगावला. 'मराठा समाजाला महिनाभरात आरक्षण मिळेल की नाही, हे सांगायला मी मुख्यमंत्री अथवा उपमुख्यमंत्री नाही,' असे विधान संभाजीराजेंनी केले. दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकीत माढा आणि सोलापूर मतदारसंघासह राज्यातील ४८ जागा स्वराज्य पक्ष स्वबळावर लढवणार आहे, अशी घोषणाही संभाजीराजे छत्रपती यांनी पंढरपुरात बोलताना केली. यावेळी त्यांच्यासोबत स्वराज्य पक्षाचे पंढरपूर तालुकाध्यक्ष महादेव तळेकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

संभाजीराजे छत्रपती हे शुक्रवारी (ता. १५ सप्टेंबर) पंढरपूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात संभाजीराजे बोलत होते. मराठा आरक्षणासाठी जालन्यात मनोज जरांगे पाटील यांनी १७ दिवस उपोषण केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आश्वासनानंतर त्यांच्या हस्ते सरबत घेऊन जरांगे यांनी आपले उपोषण मागे घेतले. जरांगे यांनी सरकारला एक महिना दहा दिवसांची मुदत दिली आहे. त्यात उपोषण मिळेल की नाही, असा प्रश्न संभाजीराजेंना विचारण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी शिंदे, फडणवीस आणि पवारांवर निशाणा साधला होता.

माझी आरक्षणासंदर्भातील भूमिका मी सर्वपक्षीय बैठकीत मांडली आहे. हा महाराष्ट्र बहुजनांचा आहे. तो एकाच छताखाली गुण्यागोविंदाने नांदावा, अशी अपेक्षा आहे. मात्र, आधले-मधले लोक गडबड करतात, त्यातून मराठा-ओबीसींमध्ये वाद वाढू पाहात आहे. नारायण राणे यांच्या विधानावर मात्र आमच त्यांचे म्हणणे ऐकले नाही, असे सांगितले. तसेच, मराठा समाजाला देण्यात येणारे आरक्षण हे न्यायालयात टिकणारे असावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला संभाजीराजे यांनी शुक्रवारी सायंकाळी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी पत्रकारांबरोबरच काही कार्यकर्तेही आले होते. त्यामुळे गर्दी झाली होती. त्या



गर्दीतील एकाचा संभाजीराजेंनी पायऱ्यांवर सोडलेल्या त्यांच्या कोल्हापुरी चप्पलांवर पाय पडला. हे त्यांच्या बॉडीगार्डच्या लक्षात आले. त्यांच्या बॉडीगार्डने संबंधित व्यक्तीला बाजूला ओढले. तसेच, खुद्द संभाजीराजेही त्याच्यावर चिडल्याचे दिसून आले. बाजूला सोडलेल्या चप्पलांवर अजाणतेपणे पाय पडल्यानंतर संभाजीराजे चिडल्याचे पाहून उपस्थितांनी आश्चर्य व्यक्त केले.

# कोटींचा चुराडा...

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज शनिवारी मराठवाड्याची राजधानी संभाजीनगर अर्थात औरंगाबाद येथे होत आहे. एखाद्या शहरात एक मंत्री आला तर त्याचा काय रुबाब असतो हे जनता पहात असते. तेव्हा अख्खे मंत्रिमंडळ येणार म्हटल्यानंतर गाड्यांचे धुराडे, खाणे-पिणे लॉजिंग ह्या बाबी पाहाता मंत्र्यांच्या दौऱ्यावर कोटींचा चुराडा होतो, यात शंकाच नाही. विभागवार मंत्रिमंडळाच्या बैठका घेण्याची अलीकडे एक फॅशनच झाली आहे, जी पूर्वी नव्हतीच. मंत्रालयात बसून राज्याच्या कारभारावर नियंत्रण ठेवता येते. सरकारने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होते की नाही हे पहाणे सरकारचेच काम आहे. हाताखाली सरकारी यंत्रणा असताना अशा बैठकांचा घाट घालण्याची गरजच काय? मंत्रिमंडळासाठी सुमारे ४०० अधिकारी दिमतीला असतील. या निमित्ताने विश्रामगृहांमध्ये विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या सगळयावरूनच जयंत पाटील यांनी राज्य सरकारला लक्ष्य केले आहे. एकीकडे मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी फाईव्ह स्टार हॉटेल्स, ३०० गाड्यांचा ताफा, दीड हजार रुपयांची जेवणाची एक थाळी असा शाही थाट... आणि दुसरीकडे मात्र कांदा उत्पादक शेतकऱ्याला अवघे २५२ रुपये अनुदान जमा करत सरकारने क्रूर थट्टा केली आहे. लोकांच्या पैशांवर मजा करणाऱ्यांना जागतिक लोकशाही दिनाच्या शुभेच्छा, असे सरतेशेवटी म्हणत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. या बैठकीसाठी २९ मंत्री, ३९ सचिव, मंत्र्यांचे स्वीय सहायक, विशेष कर्तव्य अधिकारी येणार आहेत. याशिवाय विभागातील आमदार देखील उपस्थित असतील. सुमारे तीनशे वाहनांचा ताफा मंत्री मंडळाच्या बैठकीसाठी असणार आहे. सात वर्षांपूर्वी ४९ हजार २४८ कोटी रुपयांच्या निधीतील मोजकी चारच कामे पूर्णत्वास गेल्यानंतर नव्याने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पुन्हा नव्या मराठवाडा 'पॅकेज' ची तयारी सुरू झाल्याचे सांगण्यात येते. आरक्षण कात्रीतून सरकारची तूर्त सुटका झाल्यामुळे गढूळ झालेल्या मराठवाड्यातील मतदारसंघात देशप्रेमाची फुंकर घालून सत्ताधारी भाजपाला पूरक वातावरण निर्माण करून देण्यासाठी प्रशासनासही वेगवान हालचाली करू लागले आहे. मराठवाडा मुक्तिदिनाच्या निमित्ताने होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीसमोर एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून १४ हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव आल्याचे सूत्रांनी सांगितले. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतून निजामकालीन शाळा पाडून नव्याने बांधणे, नव्या शाळाखोल्या आणि अंगणवाड्यांसाठी मोठ्या निधीची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय दुष्काळी मराठवाड्यासाठी सिंचनाच्या नव्या योजना, नदी जोड प्रकल्पाच्याही घोषणा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहेत. विविध प्रकारच्या या घोषणा म्हणजे निवडणूकपूर्व आश्वासने आहेत, तेव्हा ती देताना जपून रहा, कारण तुमच्यावर ३३ देशांचे लक्ष असते, अशी बोचरी टिप्पणी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केली आहे. एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनीही ही मंत्रिमंडळ बैठक निवडणुकीचा पूर्वीचा फार्स असल्याची टीका गुरुवारी पत्रकार बैठकीत केली. दरम्यान गेल्या चार वर्षांत भाजप- उद्धव ठाकरे यांच्या काळात आणि त्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळातही विकासकामे मार्गी लागू शकली नाहीत, अनेक बांधकामे रखडलेली आहेत. काही निर्णय केवळ कागदोपत्रीच राहिले. त्यामुळे यावेळी मंत्रिमंडळ बैठकीसमोर ठेवले जाणारे प्रस्ताव किमान अंमलबजावणीमध्ये यावेत, अशीच कामे सुचवा, अशा सूचनाही सरकारकडून देण्यात आल्या आहेत. अंतरवली सराटी येथील उपोषणामुळे मराठवाड्यातील मराठा एकवटला. हे चित्र राजकीय पटलावरही परावर्तित झाले तर या भीतीने प्रशासकीय पातळीवरही बरेच प्रयत्न सुरू आहेत. राज्य सरकारने एक चमू तयार करून तो हैदराबाद येथे पाठविला आहे. निजामकालीन कागदपत्रात कुणबी समाजाची संख्या ३८ टक्के असल्याच्या नोंदी होत्या, असे सांगितले जाते. या नोंदी कोणत्या या शोधमोहिमेतून आरक्षण पेच सुटू शकतो का, याची चाचपणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मंत्रिमडळ बैठकीपूर्वी हे सारे घडावे, अशी सरकारची इच्छा असल्याचे सांगण्यात येत आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत नव्या घोषणा केल्या जातील. आश्वासनांचा पाऊस पाडला जाईल. खरेच त्याची अंमलबजावणी होणार काय? अन्यथा पुढचे पाठ, मागचे सपाट. दुसरे काय होणार?



सामाजिक

# आदिवासी समाजाची दशा आणि दिशा

१९ व्या शतकात २ महायुद्ध झाली. या महायुद्धात प्रचंड विध्वंस झाला. त्यानंतर अस्तित्वात असणाऱ्या सर्व देशांनी एकमेकांचे स्वातंत्र्य, अधिकार, मैत्री समन्वय यांना प्रथमच मान्यता दिली. याचाच भाग म्हणून २४ ऑक्टोबर १९४५ ला संयुक्त राष्ट्र संघ अस्तित्वात आला. या संयुक्त राष्ट्रसंघात एकूण १९२ देशांचा समावेश आहे. त्यात भारत देशदेखील आहे. भारताच्या संविधान आदेश १९५० द्वारे घोषित करण्यात आलेल्या इंडिजीनियस पीपल यांची सुमारे ८ टक्के लोकसंख्या आहे आणि संविधानानुसार मूलवासी असणाऱ्या समाजाला मानवाधिकार अमलात आणण्यासाठी हक्क अधिकार आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी १९८२ साली युनोची कार्यकारणी गठीत करण्यात आली.

आदिवासी कोण आहे, त्याचा धर्म कोणता आहे, त्याची परंपरा काय आहे, इतर परंपरेची काय संबंध, तरी आज वर्तमानात आदिवासी बांधवांना हिंदू ठरवले जात आहे. आपण थोडं खोलात जाऊन विचार करावा लागेल. भारत देशाची जनगणना दर १० वर्षांनी होते. अगदी इंग्रजांच्या कालखंडामध्ये १८७१ ते१८८१ पहिली जनगणना झाली त्यामध्ये धर्म कोड हा आदिवासींसाठी अबोरिजन होता म्हणजे. बोरीजन त्या देशाचा मालक किंवा मूळ रहिवासी. थोडक्यात आदिवासी १८८१ ते १८९१ पुन्हा जनगणना झाली. त्या जनगणनेमध्ये 'बोरिजन' हा शब्द राहिला. पुढे १८९१ ते १९०१ यामध्ये जनगणना झाली. त्यामध्ये आदिवासी धर्मासाठी एनिमिस्ट होता १९०१ ते १९११ एनिमिस्ट १९११ ते १९२१ एनिमिस्ट १९२१ ते १९३१ 'ट्रायबल रिलिजन' असा शब्द होता. याचा अर्थ असा आहे, आदिवासी धर्म १९३१ ते १९४१ ट्रायब होता. १९४१ ते १९५१ ची जनगणना झाली. म्हणजे भारत स्वातंत्र्यानंतर संविधानाची निर्मिती झाली, त्यात आदिवासी समाजाला अनुसूचित जमाती असा कोड देण्यात आला.

**आज जर आपण आदिवासींची राज्यात वास्तव परिस्थिती जर पाहिली, तर आपल्या राज्यात १ कोटी ५ लाख आदिवासी आहेत. त्यात २४ आमदार, ४ खासदार नेतृत्व करतात. तरी अजूनही आदिवासी मुख्य प्रवाहापासून कोसो दूर आहे. जिवंत राहण्यासाठी संघर्ष करतो आहे. ८० टक्के समाज हा बिलो पॉवर्टी लाईनमध्ये आहे. म्हणजे बीपीएल कार्डधारक आहे. हे आकडे भयावह आहेत. समाजासाठी आणि प्रशासनासाठी २० टक्के समाज हा आरक्षणाच्या भरवश्यावर नोकरी शोधतो आहे. काही लोक नोकरी करत आहेत. या नोकरी करता या शहरात, त्या शहरात जीवनमान जगता आहेत. या समूहामध्ये ६ टक्के आदिवासी नोकरीचा हक्क घेत आहेत.**

खऱ्या अर्थाने आदिवासी समाजाचे अस्तित्व स्वाभिमान दुखावण्याचे काम केले. १८७१ पासून हा समाज आदिवासी म्हणून जनगणना झाली. संविधान संविधान कमिटीने 'ट्रायब' हा शब्द काढून त्या ठिकाणी 'शेड्युल ट्रायब' हा शब्द घेतला. या शब्दाला प्रखर विरोध जयपाल सिंग मुंडांनी केला. त्या कमिटीचे सदस्य होते आणि म्हणाले, 'मी संविधान से आदिवासी शब्द हटाने से सक्त विरोध करता हूँ। त्याचा परिणाम या भारतातील वर्तमान असणाऱ्या ७०५ जमातींना झाला. आदिवासी समाज हा भोळा भाबडा आहे. त्यांना न विचारता हिंदू धर्मात घेतले आणि आज त्यांची ओळख व नागरिक यावरती परिणाम होत आहे. म्हणून जयपाल सिंग मुंडा ठणकावून सांगत होते, आदिवासी हिंदू नाहीत. संविधान कलम ३४१ मध्ये आदिवासींना अनुसूचित जमाती असं म्हटलं, हल्ली लोक 'गिरिजन' म्हणतात. आरएसएसवाले वनवासी म्हणतात. यांच्या अगोदर इंग्रजांच्या कालखंडामध्ये गिरिजन म्हणत, दस्तूर म्हणत, असुर म्हणत, दानव म्हणत, दैत्य म्हणत, राक्षस म्हणत, गुन्हेगार म्हणायला लागले, त्यानंतर गिरिजन वनवासी आलं. नंतर मूलनिवासी अशाप्रकारे आदिवासींची अस्मिता ही कायम बदलत गेली. आदिवासींचे अस्मिता पुसून टाकण्यात आली. शब्दांना महत्त्व आहे. काय शब्दांना महत्त्व आहे भारतीय संविधानातील कलम एक असे म्हणत आहे. 'इंडिया दॅट इज' भारत म्हणून भारताचा उल्लेख हिंदुस्तान करता येणार नाही. आरएसएसच्या लोकांना विनंती आहे. त्यांनी त्यांच्या विचारांच्या महाशक्तीच्या लोकांना विनंती आहे. भारतीय जनता पार्टी यांना माझा सवाल आहे. कृपया करून आम्हाला वनवासी संबोधू नका. दुसऱ्याला जर संबोधायचे असेल, तर आर्टिकल एकचे उल्लंघन करत आहेत. हा भारत देश आहे. या भारत देशाला हिंदुस्तान म्हणू शकत नाही. म्हणून या वास्तवतेला समजून घेण्याची गरज आहे. कदाचित हे आपल्याला दैत्य म्हणत असतील, दस्तूर म्हणत असतील, वनवासी म्हणत असतील, गिरिजन म्हणत असतील. या सर्वांचं अमानवी संबोधनाने मानवी मूल्यांचा भाग आहे. ही सुधारणावादी विकृती हे समाजाचं लक्षण म्हणून समजून घ्यावं लागेल.



भारताच्या इतिहासात आपल्याला असे लक्षात येते. वैदिक कालखंडापासून म्हणजे, वीर एकलव्यापासून तर ब्रिटिश सत्तापर्यंत क्रांतीसूर्य भगवान धरती आबा, बिरसा मुंडा, राघोजी भांगरे, तीलका मांझी, रॉबिन हूड, तंट्या भिल, ख्वाजा नाईक, बाबूराव शेडमाके, राणी दुर्गावती मडावी, शामा दादा कोलाम, बी. एस. कोकणी, देवाजी राऊतपर्यंत डांगपासून ते सेवन सिस्टरपर्यंत जे आदिवासींचे जे संघर्ष दिसतात ते केवळ साधन संपत्तीच्या प्राप्तीसाठी नसून अस्मितेच्या रक्षणासाठी होते. इसवी सन १७६७ जंगल महालच्या खैरा माजी भूमीच धोलोच्या उलगुलानाची शृंखला चालू आहे. मध्य भारतात सकरागड भागात पहाडिया मांजिया संताल नायका मुखिया यांनी १७६६ ते १७७८ तब्बल १२ वर्षे सरदार रमण अडीयाच्या नेतृत्वाखाली पहाडी आंदोलन उभे केले व लढा दिला. १७७० मध्ये मुंडांचा पलागु विद्रोह, तील का मांझी यांच्या नेतृत्वात संताल परगनातील दामीन विद्रोह १७७५ मध्ये जसजसा एकेका विद्रोहाचा बिमोड होत गेला. तस तशी शेकडो आंदोलने उभी राहिली. सिद्धू कानो चांद भैरोनी १८५५ मध्ये संताल क्रांती म्हणून आज इतिहासात नोंद आहे.

काही लोक नोकरी करत आहेत. या नोकरीकरता या शहरात, त्या शहरात जीवनमान जगता आहेत. या समूहामध्ये ६ टक्के आदिवासी नोकरीचा हक्क घेत आहेत. १९९१ नंतर हा समाज १० टक्के नोकरीत समावेश झाला आहे. अगदी अलीकडच्या काळात आहे. १ टक्के क्लास वन अधिकारी आहेत. सेकंड क्लास १.५ टक्के इतका आहे व थर्ड क्लास २.५ टक्के इतका आहे आणि फोर्थ क्लासमध्ये ६ टक्के लोक काम करतात. मग आपण पाहतो आहे की, आज आदिवासी समाज ८० टक्के बिलो पॉवर्टी लाईनमध्ये म्हणजे बीपीएल आहे. त्यांना संविधानातील आरक्षणाचा लाभ घेता आला नाही आणि दुसऱ्या बाजूला या देशातील या राज्यातील बोगस आदिवासींची घुसखोरी वाढत आहे. मग राज्यात कोणते सरकार असो, त्या बोगसांना पाठीशी घालणार आहे. त्यामुळे खऱ्या आदिवासींना न्याय कधी मिळणार, हा फार मोठा प्रश्न आहे.

**- पंकज ठाकरे.**

टुडेज् ब्लॉग

# भारताच्या असंख्य नावांची उत्क्रांती

हिंदुस्थान आणि भारत यांच्याशी संबंधित असंख्य नावे त्याच्या संपूर्ण इतिहासातील विशिष्ट कालखंडाचे अनावरण करतात. भारताचा चिरंतन संदर्भ प्राचीन काळातील मूल्ये आणि हिंदू पौराणिक नायकांबद्दल आदर दर्शवतो. हिंदुस्थानातून निर्माण होणारे अंतर-सांस्कृतिक प्रभाव प्रतिबिंबित होतात. शेवटी भारत' हा शब्द प्रभुत्वाच्या अवशेषांना प्रतिबिंबित करतो, ज्याने समकालीन राजकीय गतिशीलतेला आकार दिला. प्रत्येक नाव वेगवेगळ्या युग, दृष्टिकोन आणि पैलूंमध्ये एक खिडकी उघडते. एकत्रितपणे ते समृद्ध सांस्कृतिक वारसा समाविष्ट करतात जे आजचे अविश्वसनीय भारतीय राष्ट्र आहे. भारताच्या असंख्य नावांची उत्क्रांती देशाचा जटिल वारसा, ऐतिहासिक परिवर्तने आणि सांस्कृतिक विविधता दर्शवते.

सुमारे १२,००० वर्षांपूर्वी शेतीने समाजात असा बदल घडवून आणला आणि लोक ज्या पद्धतीने जगले आणि त्याच्या विकासाला नवपाषाण क्रांती असे संबोधले गेले. पारंपरिक शिकारी-संकलक जीवनशैली, मानवांनी त्यांच्या उत्क्रांतीच्या काळापासून अनुसरण केले. कायमस्वरूपी वसाहती आणि विश्वासार्ह अन्न पुरवठ्याच्या बाजूने बाजूला सारले गेले. शेतीतून शहरे आणि सभ्यता वाढली आणि मागणी पूर्ण करण्यासाठी आता पिके आणि प्राण्यांची शेती केली जाऊ शकत असल्याने जागतिक लोकसंख्या १०,००० वर्षांपूर्वी सुमारे ५ दशलक्ष लोकसंख्येवरून आज आठ अब्ज झाली.



नामकरण हे भाषेइतकेच जुने आहे आणि कदाचित जमिनीच्या गुणधर्मांनुसार ठिकाणांची नावे दिली गेली असण्याची शक्यता आहे. झाडे असलेली जागा, टेकडीवर किंवा सर्व प्राण्यांसह आणि कालांतराने ही नावे बदलली गेली, विकसित झाली, भाषांतरित झाली आणि चुकीचा अर्थ लावला गेला. जमिनी जिंकल्या, हस्तांतरित केल्या आणि पुन्हा लोकसंख्या तयार झाली. आज आपल्याकडे जी नावे आहेत त्यासाठी संपूर्ण मानवी इतिहास लागला, परंतु काही नावे थोडेसे उलगडून त्यांचे मूळ प्रकट करतात.

बहुतेक वेळा एखाद्या देशाचे इंग्रजी नाव असे होते. स्थायिक किंवा व्यापारी येतात आणि एकतर त्यांना भेटलेल्या जमातींचे नाव देतात किंवा टोळींचे नाव आधीपासून वापरतात. नवीन पाहुण्यांच्या मनावर विजय असल्यास ते त्यांच्या नेत्याच्या नावावर स्थानिक भूगोल किंवा त्यांच्या स्वतःच्या भूमीची आठवण करून देणारे काहीतरी नवीन शोधलेल्या भूमीचे नाव ठेवतील. काहींची नावे लोकांसाठी ठेवली जातात. काहींची नावे चुकूनही ठेवली जातात. उदाहरणार्थ कॅनडा या देशाचे नाव : कनाटा म्हणजे गाव. १६व्या शतकातील संशोधक जॅक कार्टियरने हे देशाचे नाव असल्याचे गृहीत धरले होते, जेव्हा तो मूळ लोकांचा सामना करत होता.

भारत' हे नाव वैदिक जमात (टोळी) भरत' नावावरून आले आहे, ज्यांचा उल्लेख ऋग्वेदात आर्यवर्तातील मूळ जमातींपैकी एक म्हणून करण्यात आला आहे आणि विशेषतः दहा राजांच्या युद्धात भाग घेतला आहे. इतर काही पुराणातील उताऱ्यांचा उल्लेख भरत लोकांसारखाच आहे, ज्यांचे वर्णन महाभारतात दुष्यंताच्या पुत्र भरताचे वंशज म्हणून केले जाते.

मध्य पर्शियनमध्ये बहुधा पहिल्या शतकापासून स्तान हा प्रत्यय जोडला गेला, जो देश किंवा प्रदेशाचे सूचक आहे. सध्याचा हिंदुस्थान शब्द तयार करतो. अशा प्रकारे इ. स. २६२ मधील शापूर १च्या नक्श-ए-रुस्तम शिलालेखात सिंधचा उल्लेख हिंदुस्थान किंवा सिंधू भूमी' म्हणून करण्यात आला. मध्य पूर्व आशियातील लोक हिंदू' म्हणून ओळखत, तर ग्रीक व युरोपियन लोक सिंधू' ह्या शब्दाचा उच्चार इंदू' असा करत. साहजिकच ते सिंधू' नदीला इंदू' किंवा इंडस' नदी म्हणून संबोधू लागले आणि पुढे ह्या प्रदेशाला युरोपियन आक्रमणकरांकडून भारताला इंडिया हे नाव मिळाले.

**- प्रशांत कळमणकर.**


जन्म हा अखेरचा

कसला उपदेश अन् काय? तुझ्यासाठी उपदेश करा असे सांगितल्याबरोबर ते जीव गेल्याप्रमाणे खाली पडले आणि आम्ही घाबरुन निघून आलो. एवढे बोलून ते तेथून निघून गावाबाहेरच्या एका झाडाखाली जाऊन बसले. दोघे विचार करीत होते. गुरुंना काय झाले असावे? असा बराच काळ गेला. त्यांना झाडावर पोपटाचा आवाज ऐकू आला.

''सद्गृहस्थांनो! मी तुमचा फार ऋणी आहे.'' त्यांनी आश्चर्याने वर पाहिले तर पिंजऱ्यातला पोपट झाडाच्या फांदीवर बसून बोलत होता. दोघांनी त्याला विचारले, ''तू इथे कसा काय? पिंजऱ्यातून कसा काय सुटलास?''

''भल्या माणसांनो!'' पोपट म्हणाला. ''तुम्ही माझा प्रश्न विचारल्यावर गुरु निश्चेष्ट पडले. हा माझ्यासाठी उपदेशच होता. तो तुम्हांला समजला नाही पण मला बरोबर समजला. मी पिंजऱ्यात काही हालचाल न करता जीव गेल्याप्रमाणे पडून राहिलो. तेव्हा मालकाने मी मेलो असे समजून मला पिंजऱ्याबाहेर काढून फेकून दिले. त्याने फेकल्याबरोबर मी हा इथे तुमच्यासमोर आलो.''

## शुश्रूषुस्थल - १



गुरुंचा उपदेश असा असतो. कधी ते शब्दाने बोलतात तर कधी शरीराने. कधी त्यांचे बोलणे स्पष्ट असते तर कधी सूचक. म्हणून शिष्याने गुरुंचा उपदेश अत्यंत ध्यान देऊन ऐकला पाहिजे. जोपर्यंत मी शिव आहे असा साक्षात्कार होत नाही तोपर्यंत तो श्रवण करावा. सांसारिक गोष्टी कितीही ऐकल्या तर त्यामुळे संसारात अधिकाधिक फसाल. पण गुरुपदेश ऐकाल तर संसारमुक्त व्हाल. तुम्हीही अशी श्रवणभक्ती करावी, असा आशीर्वाद.

### शुश्रूषुस्थल - २

शब्दामुळे मनुष्य घडतो आणि शब्दामुळेच बिघडतो. शास्त्रांचे शब्द ऐकून शास्त्रविहित वर्तन केले तर मनुष्याचे जीवन सुसंस्कारसंपन्न होते. सांसारिक शब्दांनी मात्र मनुष्य बिघडण्याचीच शक्यता असते. पाणी उताराकडे वाहते, त्याप्रमाणे शास्त्रनिषिद्ध कर्मे करण्याकडे मनुष्याचा कल असतो. पाणी उंचवट्याकडे नेण्यासाठी खास प्रयत्न करावे लागतात. **(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# हरतालिका व्रत कोणी करावे?

भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तृतीया तिथीला हरतालिकेचे व्रत केले जाते. या दिवशी महिला आपल्या पतीसाठी चांगले आरोग्य, दीर्घायुष्य, सुखी जीवन आणि यशासाठी व्रत करतात, तर कुमारीका मनासारखा पती मिळावा म्हणून हे व्रत करतात. यंदा १८ सप्टेंबर रोजी हरतालिका तृतीया असणार आहे. हरतालिकाच्या व्रताच्या दिवशी देवी पार्वतीसोबत गणपती, भगवान शंकर, कार्तिकेय स्वामी यांची देखील पूजा केली जाते.



हरतालिका तीज व्रत से मिलेगा अखंड सौभाग्य, पूजन से प्रसन्न होंगे उमा महेश्वर. प्राचीन काळात देवी पार्वतीने भगवान शंकर पती व्हावे म्हणून हरतालिकेचे व्रत केले होते. पार्वती यांनी केलेले व्रत आणि तप यांच्या प्रभावामुळे भगवान शंकत प्रसन्न झाले. यानंतर भगवान शंकर आणि पार्वती यांचा विवाह झाला. हरतालिकेचे व्रत करणाऱ्या महिला देवी पार्वतीच्या कथा ऐकतात. कथेत देवी पार्वतीचा त्याग, संयम, धैर्य आणि पतिव्रता याचा महिमा सांगितला आहे. ही कथा ऐकल्यानंतर महिलांचे पुण्य, मनोबल वाढवते आणि त्यांच्या समस्या दूर होतात.

प्रजापती दक्षाची कन्या सतीने भगवान शंकराच्या अपमानाने दुःखी होऊन तिच्या वडिलांच्या यज्ञकुंडात उडी मारली आणि प्राण त्याग केला. त्यानंतर देवीने मैना आणि हिमावनची मुलगीच्या रुपात अवतार घेतला. देवी पार्वतीने भगवान शंकर पती होण्यासाठी व्रत करून कठोर तप केला. यामुळे भगवान शंकर प्रसन्न झाले आणि पार्वती यांना पत्नी म्हणू स्वीकारण्याचे वरदान दिले. त्यानंतर हिमावन आणि मैना यांनी शंकर-पार्वती यांचे लग्न लावून दिले.

**हरतालिका व्रत कसे कराल?**

या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून शुभ्र कपडे परिधान करावे, त्यानंतर घर स्वच्छ करून घरातील देवघरातील देवांची पूजा करावी. त्यानंतर हरतालिका देवीची मूर्तीची पूजा करावी, शिवपिंडीची देखील पूजा करावी. तसेच हरितालिका कथेचे पठण करावे आणि 'गौरी मे प्रियतां नित्यं अघनाशाय मंगला। सौभाग्यायास्तु ललिता भवानी सर्वसिद्धये ।।' या मंत्राचा जप करा. या दिवशी हे व्रत फळं खाऊन करावे. हे व्रत दुसऱ्या दिवशी सकाळी सोडावे. व्रताच्या दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान केल्यानंतर पूजा केली जाते. पूजा केल्यानंतर महिला अन्न आणि पाणी घेतात.

# कर्जफेडीनंतरची परवड थांबवा

मूळ कागदपत्रे परत करण्यात हयगय करण्याच्या प्रकारांवर भारतीय रिझर्व्ह बँकेने आता कठोर नियमाचा बडगा उगारला असून कागदपत्रे ३० दिवसांत देण्याचे बंधन घातले आहे. 'तुमचा क्रमांक कर्जासाठी मंजूर झाला आहे', असे सांगणारे हजारो फोन ग्राहकांना येत असतात. प्रत्यक्षात गृहकर्ज, शिक्षणकर्ज घेण्याची वेळ येते, तेव्हा त्यातील खाचाखोचा लक्षात येतात. कर्जाची परतफेड झाल्यावर मात्र आपल्याच मालमत्तेची तारण ठेवलेली मूळ कागदपत्रे परत मिळविण्यासाठी ऋणकोंना बँका किंवा पतसंस्थेचे उंबरठे झिजवण्याची वेळ येते.



मूळ कागदपत्रे परत करण्यात हयगय करण्याच्या प्रकारांवर भारतीय रिझर्व्ह बँकेने आता कठोर नियमाचा बडगा उगारला असून कागदपत्रे ३० दिवसांत देण्याचे बंधन घातले आहे. ते न पाळल्यास दिवसाला पाच हजार हजार रुपये दंड आकारण्याचेही बजावले आहे. या कारवाईचे स्वागत करायला हवे. आतापर्यंत कित्येक नामांकित बँकांकडूनही ऋणकोंच्या मालमत्तेची मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याची प्रकरण घडली आहेत. अशा वेळी कोणत्याही बँका तातडीने चूक मान्य करत नाहीत. ग्राहकाला 'उद्या या', 'आठ दिवसांनी या', अशी टोलवाटोलवी करत राहतात. यात होरपळलेल्या काही ग्राहकांनी 'ग्राहक तंटा निवारण मंचां'चे दरवाजे ठोठावले. या मंचांनी बँका किंवा वित्तसंस्थांना खडे बोल सुनावले होते. पाच ते नऊ लाख रुपये दंडही ठोठावला होता. मूळ कागदपत्रे गहाळ होणे, म्हणजे एक प्रकारे त्या मालमत्तेच्या मालकीवरच प्रश्नचिन्ह उभे राहते. असा प्रकार घडल्यास ऋणको किंवा मूळ जागामालकाला मोठे सव्यासपव्य करावे लागतात.

पहिली पायरी म्हणजे आधी बँक किंवा वित्तसंस्थेकडून ते गहाळ झाल्याची पोचपावती घ्यावी लागते. ते टाळण्याचा बँकांचा प्रयत्न असतो. त्यानंतर पोलीस फिर्याद करावी लागते, तिथेही तक्रारदाराला मिळणारी वागणूक सर्वज्ञात आहे. त्यानंतर तीन भाषांमध्ये जाहीर नोटीस प्रकाशित करावी लागते. मग उपनिबंधकांकडून या मालमत्तेच्या मालकीची प्रमाणित प्रत मिळविण्याची धडपड करावी लागते. निबंधक कार्यालयांमध्ये योग्य खिडकी शोधण्यातच ग्राहक गर्भगळीत होऊन जातो. आयुष्यभर गृहकर्जाचे हप्ते भरत उमेदीची वर्षे झिजवल्यावर पगारदारांचे कर्ज फिटते. मात्र, नेमक्या याच टप्प्यावर बँक किंवा वित्तसंस्थांच्या हलगर्जीपायी कागदपत्रे गहाळ केल्याचे लक्षात आल्यास कोर्टकचेरीच्या नव्या लढ्यासाठी अंगी कुठून बळ येणार? रिझर्व्ह बँकेच्या नव्या नियमामुळे या सर्व त्रासातून ऋणकोंची मुक्ती व्हायला हवी. नित्यनेमाने कर्जफेड करणाऱ्यांना बँका व वित्तसंस्था अनेकदा कस्पटासमान लेखतात व कर्जे बुडविणाऱ्या बड्या धेंडांना मखरात बसवतात. या वृत्तीलाही चाप बसायला हवा.

# तगडी लढत अपेक्षित

'इंडिया' आघाडीची व्यापकता जाणवायला लागल्याने सत्ताधारी भाजपाची चिंता दिवसेंदिवस तीव्र होऊ लागली आहे. त्यांची आधीची अवस्था अतिशय बेफिकिर होती. आता ते जागरूक झाले आहेत. कर्नाटकातील धर्मनिरपेक्ष जनता दलासोबत झालेली युती त्यांना नक्कीच दिलासा देईल. या राजकीय तडजोडीतून 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द भाजपच्या पुन्हा एकवार निकट आला. त्यावरून त्यांना बोचऱ्या टीकेचाही सामना करावा लागला आहे.




विधानसभा निवडणुकीत भाजपला कर्नाटकात मोठा फटका बसला. मागच्या वेळी २८ पैकी २५ जागा जिंकून भाजपने लोकसभेत देदीप्यमान यश कमावले. आता ते चार जागा धर्मनिरपेक्ष जनता दलासाठी सोडतील. २०१९मध्ये धर्मनिरपेक्ष जनता दलाची काँग्रेससोबत सलगी होती. तेव्हा त्यांनी सात जागा लढविल्या होत्या. यंदा भाजपशी जवळीक साधताना त्यांना निवडणुकीआधीच तीन जागांवर पाणी सोडावे लागले. अर्थात २००४मध्ये त्यांच्यातील जागावाटप समीकरण २४ आणि ४ असेच होते. यापूर्वी सहयोगी म्हणून दोन्ही पक्ष एकत्र सरकारमध्येही होते. २००९ आणि २०१४च्या लोकसभेसाठी भाजप, काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दल वेगवेगळे लढले होते. सध्या स्थिती बदलली आहे. काँग्रेसला कर्नाटक विधानसभेत मिळालेल्या यशात भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचा फारच संकोच झाला. भाजपला देशपातळीवर नव्या दोस्तांची फार गरज भासू लागली आहे. 'इंडिया' आघाडीचा आधी कठीण वाटणारा डाव हळूहळू रंगू लागला आहे. भिन्न पक्षांचे असे एकत्र येणे 'एनडीए'ला अपेक्षित नव्हते. या स्थितीत माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या पक्षाने भाजपला साथ देण्यामागे वक्कलिग समाजाच्या मतांची विभागणी टाळण्याची खेळी आहे.

कर्नाटकात सर्वाधिक असलेल्या लिंगायत मतांवर येडियुरप्पांच्या रूपाने भाजपाने पारंपरिक पकड कायम ठेवली आहे. परस्परांची वर्तमानातील अगतिकता आणि भविष्यातील भक्कमताही या राजकीय भागीदारीवर अवलंबून आहे. विधानसभेच्या २२४ जागांमध्ये काँग्रेस १३५, भाजप ६६ तर धर्मनिरपेक्ष जनता दल १९ अशी स्थिती आहे. देवेगौडांच्या पक्षाने मागच्या लोकसभेतील एकमेव हासन मतदारसंघाची जागा भाजपचा पाडाव करूनच मिळवली होती. शपथपत्रात संपत्तीची माहिती दडविल्याच्या कारणावरून ती जागाही अलीकडेच रद्दबातल झाली. धर्मनिरपेक्ष जनता दलाचे लोकसभेतील खाते त्यामुळे शून्यावर आले. काँग्रेसकडे एकमेव खासदार आहे. खरा तणाव भाजपवरच आहे. आत्मविश्वास दुणावलेल्या काँग्रेसकडून दक्षिणेच्या या राज्यात तगडी लढत अपेक्षित आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## प्रतिभा नवले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

✔ **माढा** : सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने चालू वर्षाचा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार माढा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केदार वस्ती (उपळाई खुर्द) येथील सहशिक्षिका श्रीमती प्रतिभा सुभाष नवले यांना जिल्ह्याचे पालकमंत्री श्री राधाकृष्ण विखे -पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी सौ मनीषा आव्हाळे यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. प्रतिभा नवले यांनी विविध उपक्रम व समाजाचा सहभाग याच्या माध्यमातून केलेला शाळेचा कायापालट व मुलांचा शैक्षणिक विकास याबद्दल त्यांना हा पुरस्कार दिला गेला आहे. 'आजी आजोबा' या उपक्रमाची महाराष्ट्र शासनाकडून दखल घेऊन त्या संदर्भात परिपत्रक निर्गमित केले आहे. सर फाउंडेशन सारख्या राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्थेसह विविध संस्थांकडून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पुरस्काराबद्दल गटशिक्षणाधिकारी विकास यादव बंडू शिंदे साहेब, केंद्रप्रमुख दिगंबर काळेमुख्याध्यापक विजय काळे, विस्ताराधिकारी शोभा लोंढे , अर्जुन गवळी, शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, शिक्षक मित्रपरिवारांनी अभिनंदन केले आहे.

## मोटारसायकलला कट मारला; कोयत्याने मारहाण

✔ **सोलापूर** : मोटारसायकलला कट मारल्याचा जाब विचारल्या प्रकरणी तीन जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अनिल शिंदे, दादा भोसले,सागर बेळमकर (सर्व.रा.सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.याप्रकरणी ओंकार संजय संयजसिंग रजपूत (वय-२५,रा. सिद्धरामेश्वर नगर भाग १,एमआयडीसी) याने जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास वालचंद कॉलेज समोर घडली. ओंकार याच्या मोटारसायकलला कट मारल्याने वरील संशयित आरोपींना कट कशाला मारला असे विचारले असता,अनिल शिंदे याने शिवीगाळ करून कोयत्याने हातावर मारले.त्यानंतर दादा भोसले व सागर बेळमकर याने मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिल्याच म्हटले आहे.पुढील तपास हवालदार जाधव हे करीत आहेत.

## भांडणाचा राग मनात धरून लोखंडी रॉडने मारहाण

✔ **सोलापूर** : गेल्या वर्षी गणपती विसर्जन मिरवणुकीत झालेल्या भांडणाच्या कारणावरून तरुणास लोखंडी रॉडने व हॉकी स्टिकने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देऊन पाच हजार रुपये किमतीची बाली काढून घेतली व तसेच गळ्यातील दोन तोळे वजनाचे सोन्याचे लॉकेट काढून घेतल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १२ सप्टेंबर रोजी रात्री रूपाभवानी मंदिर पाणी गिरणी समोर घडली.याप्रकरणी समर्थ राजकुमार माशाळकर (वय-२३,रा. गांधीनगर नं ६,अक्कलकोट रोड,एमआयडीसी) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. शिवम भोसले,ओंकार मोहिते,सॅम भोसले व त्यांचे तीन अनोळखी साथीदारांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे तपास स.पो.नि. जाधव करीत आहेत.

## विवाहितेचा छळ ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : विवाहिता ही सासरी नांदण्यास असताना सासरकडच्या मंडळींनी विवाहितेला लग्नात हुंडा दिला नाही,चांगला मानपान केला नाही,तू मोलकरीण सारखे राहायचे,तुम्ही दरिद्री लोक आहात असे म्हणत नवीन घर बांधण्यासाठी दहा लाख रुपये घेऊन ये म्हणून मारहाण करत छळ केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २० जून २०१५ ते २९ जून २०२३ दरम्यान फिर्यादी यांचे सासरी सासवड पुणे येथे घडली. याप्रकरणी राजश्री प्रशांत थोरात (वय-३६,रा.मुरारजी पेठ,सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पती प्रशांत थोरात,सासू रेखा थोरात,सासरे दीपक थोरात,नणंद मीनाक्षी घाडवे (रा. खंडोबा नगर,बारामती, ) व तृप्ती सागर निखुडे (रा.सासवड ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास हवालदार दराडे हे करीत आहेत.

# अभियंत्यांनी कामाला कल्पकतेची जोड द्यावी : आव्हाळे

## २६ अभियंते व गुणवंत पाल्यांचा गौरव

✔ सुराज्य/सोलापूर

**छत्रपती शिवाजी महाराजांनी समुद्रात देखील किल्ले बांधून घेतले. आजही किल्ले अभेद्य आहे. अभियंत्यांनी कामाला कल्पकतेची जोड द्यावी.जेणे करून काम पाहून नाव घेतले पाहिजे असे काम करा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केले.**

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात शुक्रवारी अभियंता दिना निमित्त सर विश्वेश्वरय्या यांची जयंती व उत्कृष्ट अभियंता पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या सिईओ मनिषा आव्हाळे या होत्या. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, जिल्हा जलसंधारण अधिकारी दिनकर महिंद्रकर प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी २६ अभियंतां यांचा सपत्नीक गौरव करणेत आला. तसेच गुणवंत पाल्यांचा सत्कार आव्हाळे यांच्या हस्ते करण्यात आला.

छोट्यातले छोटे काम करा पण चांगले काम करा असे सांगून सिईओ मनिषा आव्हाळे म्हणाले, स्वतच्या कल्पकतेची जोड द्या. आजचे युगात जे तंत्रज्ञान आहे त्यांची जोड द्या. त्याला गुणवत्ता नक्की येईल. पुढच्या २० वर्षे या कामांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्या. शाळा असे प्राथमिक केंद्र, जलजीवन मिशन, आदी कामे गुणवत्तेची करा. कामात जीव ओतला तर काम करणेस आनंद मिळतो. अभियंत्याचे देशाच्या उभारणीत मोठे योगदान आहे. असे मत कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी बोलताना व्यक्त केले.



### शाबासकीची थाप कामाला प्रोत्साहन देते : कोहिणकर

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिणकर म्हणाले, जलजीवन मिशन, बांधकामे १ व २ तसेच जनसुविधा व इतर कामे अभियंत्यांनी केली आहेत. ४० टक्के पेक्षा अधिक कामे पुर्णत्वाकडे आहे. कधी तरी काम करीत असताना शाबासकीची थाप पाठीवर मिळाली कि काम करणेस प्रेरणा मिळते. असेही अतिरिक्त सिईओ कोहिणकर यांनी सांगितले.

### बाबा मला इंजिनियर हो म्हणायचे!

माझे बाबा मला इंजिनियर हो म्हणायचे. त्यानंतर आयएएस हो असा सल्ला दिला होता मी विधी विभागा पदव्युत्तर शिक्षण घेतले. नंतर आयएएस झाले. कुठल्याही शाखा आपण एका चौकडीत बसवू शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांचे खुप मोठे व्हीजन होते. ते म्हणायचे समुद्रात किल्ले बांधा. त्यांनी समुद्रात किल्ले बांधून दाखविले असेही सिईओ आव्हाळे यांनी सांगितले.

या कार्यक्रमास माजी कार्यकारी अभियंता पंडित भोसले, उप अभियंता सुनील कटकधोंड, उप अभियंता सुरेश कमळे, कर्मचारी संघटनेचे विवेक लिंगराज, लिपिकवर्गीय कर्मचारी संघचनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, प्रमुख उपस्थित होते. शाखा अभियंता सोनाली कदम, रविशंकर बोधले, आयुब शेख, सिध्दाराम बोरूटे, सचिन पवार, सुंदर हस्ताक्षर असलेले अभिमन्यु कांबळे, शाखा अभियंता मुजावर, मेघराज कोरे, अभियंता चेतन वाघमारे, माजी उप अभियंता रमेश चौगुले , चेतन भोसले यांनी कार्यक्रम यशस्वी करणे साठी परिश्रम घेतले. प्रास्तविक कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे यांनी केले सूत्रसंचालन मंगेश लामकाने यांनी केले.तर आभार रवीशंकर बोधले यांनी आहार मानले.

## कल्याणशेट्टी कुटुंबाकडून रक्षाबंधन साजरे

# हजारो महिलांनी सचिनदादांना बांधल्या राख्या

✔ सुराज्य/अक्कलकोट



आ. सचिन कल्याणशेट्टी यांना कार्ये क्षेत्रातील सर्व शासकीय, निमशासकीय महिला अधिकारी, कर्मचारी असे शेकडो भगिनींनी सालाबादप्रमाणे यंदाही राखी बांधून आशीर्वाद दिले.या आगळावेगळा उपक्रमाने महिला वर्ग भारावून गेल्या होत्या.

मागील चार वर्षांपासून हा उपक्रम आ. कल्याणशेट्टी राबवत आहेत. याप्रसंगी पोलीस, आरोग्य, तहसील, नगरपालिका, कृषी, पंचायत समिती, भूमिअभिलेख, यासह विविध शासकीय, निमशासकीय आशा सर्व कार्यालयातील शेकडो महिलांनी राखी बांधून शुभाशीर्वाद दिल्या. हा उपक्रम त्यांच्या विवेकानंद पार्क येथील पद्मालय या निवासस्थानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता.

यावेळी सुरेखा कल्याणशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य मंगल कल्याणशेट्टी, शांभवी कल्याणशेट्टी, श्रेया कल्याणशेट्टी, गौरी कल्याणशेट्टी, पूजा कल्याणशेट्टी, सोनाली शिंदे, रुपाली येणगुरे,सोनिया पाटील, रुपाली शहा, पूनम काक्कळगी, राजश्री झिंगाडे, आदी शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या. या प्रसंगी पोलीस, आरोग्य, तहसील, पंचायत समिती, कृषी विभाग, नगरपालिका, आशा सरकारी, निमसरकारी, शाळा, कॉलेज, बचत गट, अक्कलकोट, दुधनी, मैदर्गी, चपळगाव, वागदरी, शिरवळ, हन्नूर, जेऊर, करजगी, तडवळ, नागणसुर, आचेगाव, वळसंग, कुंभारी, बोरामणी, सलगर आशा विविध विभागातील महिला एकत्रित आल्या होत्या.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नी खूपसे-पाटलांनी घेतली पवारांची भेट

✔ सुराज्य/सोलापूर



गतवर्षीचा गळीत हंगाम बंद होऊन सुमारे सहा ते सात महिने होऊन गेले तरीही करमाळा तालुक्यातील मकाई, कमलाई चे देणे बाकी आहे. शेतकऱ्यांच्या हाता-खिशात पैसा नसल्यामुळे शेतकरी घाईकुतीला आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची सरसकट विज बिल माफी करावी या मागणीसाठी जनशक्ती संघटनेचे अतुल खूपसे पाटील यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली यावेळी शेतकऱ्यांच्या या प्रश्नाबद्दल आपण लवकरच सरकारशी बैठक लावून अशी ग्वाही दिली असल्याचे अतुल खूपसे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून नेहमीच महाराष्ट्रातील शेतकरी शरद पवार यांच्याकडे आदराने पाहतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन जनशक्ती संघटना आज जेष्ठ नेते शरद पवार यांच्याकडे गेली होती. यावेळी शेतकऱ्यांच्या या प्रश्नांसाठी त्यांनी सुमारे ४५ मिनिटात दिले आणि सर्वच व्यथा जाणून घेतल्या. या संदर्भात आपण लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिस्त मंडळ आणि प्रशासन यांच्याशी बैठक लावून असे आश्वासन त्यांनी अतुल खूपसे पाटील यांना दिले. यावेळी प्रतापराव आरकिले, आदित्य बंडगर, विजय खुपसे, रोहन नाईकनवरे, दीपक खुपसे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## दुचाकीला कारची धडक; एकावर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

बाळे ब्रिज येथे कारने दुचाकीला धडक दिल्याने चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विनायक क्षीरसागर (वय-४३,रा.वसंत नगर,जुळे सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. फिर्यादी गणेश प्रभाकर भांडेकर (वय-३०,रा.अंबिका नगर,बाळे) यांची दुचाकी क्र.एम.एच.१३.डीसी.६२३८ यावरून मित्र निखिल गायकवाड व वैष्णवी हे मिळून सर्विस रोडने येत असताना पुण्याच्या दिशेने येणारी इनोवा कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात निखिल व मुलगी वैष्णवी जखमी केले. ही घटना १३ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास बाळे ब्रिज येथे घडली.

याप्रकरणी गणेश भांडेकर यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून विनायक क्षीरसागर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.




### महापालिका महिला व बालकल्याण समितीचे आवाहन

# विविध प्रशिक्षणासाठी महिला व मुलींनी अर्ज करावेत

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने शहरातील महिला व मुलींसाठी विविध आठ प्रकारच्या प्रशिक्षण कोर्ससाठी पात्र इच्छुक महिला व मुलींचे ऑनलाइन पद्धतीने अर्ज घेण्यास १३ सप्टेंबर २०२३ पासून सुरुवात करण्यात आली आहे. सोलापूर शहरातील महिला व मुलींसाठी एमएससीआयटी, टॅली, बँकिंग, ब्युटी पार्लर, फॅशन डिझायनिंग, लेडीज टेलरिंग, मार्शल आर्ट कराटे, व्रेस्टल मॅट आदी ८ कोर्सचे मोफत प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. यासाठी १६ ते ४५ वर्ष वयोमर्यादा आहे. २ ते ३ महिन्याच्या कालावधीचे हे कोर्स आहेत. पिवळे व केसरी कार्ड असणाऱ्या महिला व मुलींना यासाठी ऑनलाइन अर्ज करता येईल. शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, रेशनकार्ड, आधार कार्ड, फोटो सोबत



अपलोड करणे आवश्यक आहे. पात्र महिला व मुलींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी महापालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३ ते ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत. तरी इच्छुक पात्र महिला व मुलींनी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांनी केले आहे.

## दुचाकी पळवली

✔ **सोलापूर** : सिव्हील हॉस्पिटल मधील नवीन बी ब्लॉक समोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीयू.९६२१ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना ११ सप्टेंबर रोजी सकाळी दहा ते सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी दीपक मल्लिनाथ पवार (वय-२६,रा. खुर्द लमाण तांडा,ता.मोहोळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पोलीस हवालदार मोरे हे करीत आहेत.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण मसुदा**

सोलापूर महानगरपालिका विद्युत विभाग (मुख्य कार्यालय) अंतर्गत इंद्रभुवन इमारत येथील मिटींग हॉल करीता Floor Standing Split ए. सी. बसवून कार्यान्वित करुन देणेबाबत कामाचे ई-निविदा जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे

**Tender ID-2023_SMC_945449_1**

तरी वर नमुद कामाचे ई-निविदा हे शासनाच्या अधिकृत https://mahatender.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे.
IDU Model No: 2 ton Diakin - FXL.Q63MAVE
ODU Model No : RXQ12ARY6

**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सुचना क्र. १२/ २०२३-२४**

महावितरण तसेच शासन ई-नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदाराकडुन कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत सोलापूर सं व सु मंडल कार्यक्षेत्रातील विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रू. |
|---|---|---|
| टि-३७/ २०२३-२४ | सं व सु विभाग बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीकामे करणे (कालावधी ०६ महिने) | रू. ९. ९९ लाख |
| टि-३८/ २०२३-२४ | सं व सु विभाग पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्ती कामे करणे. (कालावधी ०६ महिने) | रू. ९. ९९ लाख |
| टि-३९/ २०२३-२४ | सं व सु विभाग अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्ती कामे करणे. (कालावधी ०६ महिने) | रू. ९. ९८ लाख |
| टि-४०/ २०२३-२४ | सं व सु विभाग सोलापूर शहर ता. जि. सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्ती कामे करणे. (कालावधी ०६ महिने) | रू. ९. ९८ लाख |
| टि-४१/ २०२३-२४ | सं व सु विभाग सोलापूर शहर ता. जि. सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्ती कामे करणे. (कालावधी ०६ महिने) | रू. ९. ९८ लाख |
| | एकूण निविदा रक्कम | रू. ४०. ९२लाख |

ई- निविदा विक्रीचा कालावधी दि. १६ सप्टेंबर २०२३ ते दि. २२ सप्टेंबर २०२३ असून ई-निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. २२ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत आहे. ई-निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क : अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था), बारामती. मो. ७८७५८९८५८९. निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे


PRO/BMTZ/106/2023-24

**कार्यकारी अभियंता (स्था),स्थापत्य विभाग, बारामती.**

# दुहेरी जलवाहिनीच्या जॅकवेलच्या खोदाईचे काम पूर्ण : आयुक्त

## जॅकवेल डिझाईनची परवानगी आल्यानंतरच प्रत्यक्ष कामास सुरुवात

सुराज्य/सोलापूर





दुहेरी जलवाहिनीसाठी आवश्यक असणाऱ्या जॅकवेल खोदाईचे काम पूर्ण झाले असून प्रत्यक्ष जॅकवेल कामाच्या डिझाईनला संबंधित विभागाकडून तांत्रिक परवानगी आल्यानंतरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, अशी माहिती महापालिका आयुक्तांनी दिली. सध्या २० किमीपर्यंतचे पाईप उपलब्ध झाले असून त्यापैकी नऊ किलोमीटर पर्यंतचे जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.

दुहेरी पाईपलाईन टाकण्यासाठी वेगवेगळ्या ८२ ठिकाणी भूसंपादन करण्यात आले आहे. मात्र, यापैकी ६३ ठिकाणी विविध प्रकारची शासकीय परवानगी आवश्यक आहे. ज्यामध्ये क्रॉसिंग, खोदकाम करण्यासाठी परवानगी यासह इतर विविध बाबींचा समावेश आहे. सोलापूर महानगरपालिकेने एकूण ६३ ठिकाणी अशा विविध परवानगी मागितल्या आहेत, त्यापैकी २२ ठिकाणी मंजुरी मिळाली आहे, त्यापैकी ८ ठिकाणी प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे तर ४१ ठिकाणी मंजुरी मिळण्याची प्रतिक्षा असल्याची माहिती आयुक्तांनी यावेळी दिली. आजतागायत जवळपास २० किलोमीटर पर्यंत लागणाऱ्या पाईपचा सप्लाय व्यवस्थितरित्या केला गेला आहे. दुहेरी पाईपलाईनचे जवळपास ९ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. दुहेरी पाईपलाईनचे काम सध्या नियोजित बार चार्टनुसार होत आहे. या प्रकल्पाच्या कामाचा आढावा दर आठवड्याला आयुक्त स्वतः घेत असल्याचे देखील आयुक्तांनी सांगितले.

### प्रधान सचिवांनी मान्य केली वाढीव निधीची मागणी

दुहेरी जलवाहिनी प्रकल्पाला एकूण ८९४ कोटी रुपयांची तांत्रिक मान्यता मिळाली आहे. त्यापैकी ५०० कोटी रुपये स्मार्ट सिटीतून तर ३९४ कोटी रुपये महापालिकेच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात येणार होते. सोलापूर महापालिका आयुक्तांनी प्रधान सचिवांसमोर दुहेरी जलवाहिनीच्या खर्चाबाबतचे सुधारित सादरीकरण करून या प्रकल्पासाठी निधी देण्याची मागणी केली. प्रधान सचिवांनी त्यापैकी ३८२ कोटी मंजूर केल्याने आयुक्तांनी प्रधान सचिवांचे आभार मानले. जलशुद्धीकरण केंद्रासाठी निविदा काढण्यात येणार असल्याचीही माहिती आयुक्तांनी यावेळी दिली.



## कर्मचाऱ्यांना फंड, इतर रक्कम सेवानिवृत्तीच्या दिवशीच देण्याची संघटनेची मागणी

**सोलापूर** : महापालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना त्यांच्या प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन व इतर रक्कमा त्यांच्या सेवा निवृत्तीच्या दिवशी द्याव्यात यासह विविध १४ मागण्यांचे निवेदन सोलापूर महापालिका कामगार संघटना संघर्ष समितीच्यावतीने महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांना देण्यात आले. शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेले महागाई भत्ते महापालिकेने आपल्या कर्मचाऱ्यांना जानेवारी २०१६ ते जानेवारी २०२१ पर्यंतचे लागू केलेले आहे. परंतु त्या महागाई भत्त्याचा फरक दिलेला नाही तो देय्य फरक तसेच माहे जून २०२१ ते जानेवारी २०२३ पर्यंतचे महागाई भत्ते लागू करून त्याचा फरक द्यावा यासह विविध चौदा मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदन देतेवेळी संघर्ष समितीचे संस्थापक जनार्दन शिंदे, अध्यक्ष सायमन गट्टू, जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे, कार्याध्यक्ष दिलावर मनियार, उपाध्यक्ष बापू सदाफुले, संघटक भालचंद्र साखरे, श्रीनिवास रामगल, विद्या मोरे, संगीता गुरव आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



## साठेनगर येथे जि. प. शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीवचे माजी सरपंच प्रकाश घाटे यांच्या वाढदिवसानिमित्त साठेनगर जि. प. प्राथमिक येथील शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे वाटप ग्रामपंचायत सदस्य जीवन गुरव, ज्ञानेश्वर लोखंडे, अजय खुर्द, सागर लोखंडे, बापू लोखंडे, कुमार लोखंडे, ब्रह्मदेव लोखंडे, मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले.

## आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल तानाजी माने यांचा आज सत्कार

**सोलापूर** : राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल शरदचंद्र प्रशालेचे मुख्याध्यापक तानाजी माने यांचा सत्कार आज शनिवार दि. १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता करण्यात येणार आहे.

मराठा समाज सेवा मंडळ संचालित, छत्रपती शिवाजी महाराज संकुल, सोलापूर व श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शरदचंद्र पवार शिक्षण संकुल, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा सत्कार समारंभ होणार आहे. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा वाबळेवाडी पुणे आंतरराष्ट्रीय शाळेचे निर्माते दत्तात्रय वारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार असून, माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली हा सत्कार छत्रपती शिवाजी प्रशालेत होईल. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पुणे विभाग शिक्षक मतदार संघ आमदार प्रा. जयंत आसगांवकर, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळ अध्यक्ष सुभाष माने तर प्रमुख उपस्थिती म्हणून व्ही. व्ही. पी. इंजिनिअरिंग कॉलेजचे अध्यक्ष जी. के. देशमुख, सहस्त्रार्जुन शिक्षण संकुलचे अध्यक्ष गणपत मिरजकर, सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्था अध्यक्ष राजूसा भूमकर, मुख्याध्यापक संघ उपाध्यक्ष महेश सरवदे उपस्थित राहणार आहेत.

## एनटीपीसी येथे हिंदी पंधरवड्याचे आयोजन

**सोलापूर** : कार्यालयीन कामकाजात तसेच दैनंदिन दळणवळणात राजभाषा हिंदीचा व्यापक प्रचार करण्याच्या उद्देशाने एनटीपीसी लिमिटेड, सोलापूर येथे गुरुवारी हिंदी दिवसाचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले.

एनटीपीसी लिमिटेड, सोलापूर येथे १४ ते २९ सप्टेंबर २०२३ या कालावधीत हिंदी पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. एनटीपीसीचे मुख्य महाव्यवस्थापक, विजय गोयल यांनी हिंदी दिन सोहळ्याचे उद्घाटन केले आणि सहभागींना राजभाषेची शपथ देण्याबरोबरच हिंदी पखवाडा (पंधरवडा) सुरू करण्याची घोषणा केली. त्यांनी कर्मचाऱ्यांना अधिकृत वापरात हिंदीचा प्रचार करण्याचे आवाहन केले. सीजीएम आणि इतर अधिकाऱ्यांनी अधिकृत भाषेचे आवाहन जारी केले आणि प्रत्येकाने त्यांच्या दैनंदिन कार्यालयीन कामकाजात शक्य तितकी अधिकृत भाषा हिंदी वापरण्यास सांगितले. पंधरवड्यादरम्यान हिंदी प्रश्नमंजुषा, घोषणा लेखन, निबंध लेखन, चित्रकला स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. वार्षिक राजभाषा कार्यक्रमात कर्मचारी आणि मुलांसह त्यांचे कुटुंबीय सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. या पंधरवड्याची सांगता २९ सप्टेंबर २०२३ रोजी पारितोषिक वितरणाने करण्यात येणार आहे.

## हत्ती दरवाजाच्या दुरुस्तीचे काम वेगात

सुराज्य/सोलापूर

भुईकोट किल्ल्यातील हत्ती दरवाजाच्या पुनर्बांधणीनंतर दुरुस्ती पर्व वेगात सुरू आहे. किल्ल्याच्या खंदकातील नागबावडी विहीर दुरुस्तीचे काम पुरातत्त्व विभागाने हाती घेतली आहे. लवकरच सावरकर मैदानाकडील बाजूने हत्ती दरवाज्यातून किल्ल्यात प्रवेश करण्याचा आनंद पर्यटकांना मिळणार आहे.

बहामनी सरदार मुहमद गवान यांनी १४६० च्या आसपास भुईकोट किल्ल्याची बांधणी केली. या किल्ल्याच्या आतील भागात कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर आहे. या मंदिराची पुष्करणी म्हणजेच नागबावडी विहीर होय. कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर बाळीवेस येथे हलविण्यात आल्यानंतर ही पुष्करणी किल्ल्याच्या पाणीपुरवठ्यासाठी वापरली जाते. आजही या विहिरीच्या पाण्यावर किल्ल्याच्या २२ एकर जागेतील विविध झाडांना पाणीपुरवठा केला जातो.

मागील काही वर्षांत या नागबावडीच्या भिंतीत झुडपे उगवल्याने पडझड झाली होती. या पाण्याचा अनेक दिवस उपसा न झाल्याने पाण्यावर शेवाळ जमा झाले होते. अंधश्रद्धेतून अनेक वस्तू येथे फेकल्या जात होत्या. कचरा, दलदल यामुळे दुर्लक्षित असलेल्या नागबावडी विहिरीकडे कुणाचेही लक्ष नव्हते. दुरुस्तीचे काम पुरातत्व विभागाने सुरू केले आहे.

## संगणक अभियंत्यास जामीन

**सोलापूर** : विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याप्रकरणी अटकेत असलेला स्वप्निल राऊत (रा. सोलापूर) या संगणक अभियंत्याला जामिनावर मुक्त करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच दिला. पीडिता ही तिच्या शाळेतील वॉशरूमकडे हात धुण्यासाठी जात असताना आरोपी स्वप्निल राऊत याने तिचा पाठलाग करुन विनयभंग केला होता. याप्रकरणी फौजदार चावडी पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केली होती. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. विलासिनी बालसुब्रह्मण्यम तर सरकारतर्फे ॲड. अनामिका मल्होत्रा यांनी काम पाहिले.

## मन्मथस्वामींचा रथोत्सव व पालखी सोहळा

सुराज्य/सोलापूर



भुसार गल्ली येथील संत शिरोमणी मन्मथ स्वामी मंदिरात श्रावणमासानिमित्त अखंड शिवनाम व श्रावणमास समाप्तीचा समारंभ मन्मथस्वामींच्या रथोत्सवाने व पालखी सोहळ्याने संपन्न आला. प्रारंभी मन्मथेश्वर देवस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त महादेवप्पा चाकोते व सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन प्रकाश वाले यांच्या हस्ते पूजा झाली. याप्रसंगी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नरेंद्र गंभिरे, सचिव ॲड. धानय्या चिवरी तसेच देवस्थानचे विश्वस्त विश्वनाथ बुरकुले, आनंद चिडगुंपी, ॲड. रेवणसिध्द कोनापुरे आदी उपस्थित होते.

श्रावणमास समाप्तीनिमित्त विविध फुलांनी सजवलेल्या मन्मथस्वामींच्या रथाची मिरवणूक ही मंगळवार पेठ, कुंभारवेस, क्रांती चौक, मधला मारूती, टिळक चौक या मार्गावरून निघाली. सोहळ्याच्या प्रारंभी सनई, चौघडे, बॅण्ड पथक, हालग्या व शोभेच्या दारूची आतिषबाजी करण्यात आली. श्री मन्मथेश्वर भजनी मंडळाने होटगी मठ, मल्लिकार्जुन मंदिर व अव्वदरू मठ येथे आपली भजन सेवा रूजू केली. श्री मन्मथेश्वर देवस्थान व हनुमान देवस्थान ट्रस्ट भजनी मंडळ सदस्य सिद्धाराम वाडी, वेदमूर्ती प्रभूलिंग स्वामी, अप्पाराव तुगांवकर, मल्लिकार्जुन जेउरे, बाळासाहेब गवळी, उमेश जिनकेरी, दत्तात्रय गवळी, आनंद साखरे, सुनिल शरणार्थी, संतोष शिलवंत, मनोज खंड्रे, गणेश खंड्रे, मल्लेश पुरवंत, वीरशैव व्हिजनचे राजशेखर बुरकुले उपस्थित होते.

## २७ ऑक्टोबरला ‘सिंगल’ करणार धमाल

**सोलापूर** : आजकाल कोणी 'एकटं' असलं की, लोकांच्या भुवया लगेच उंचावतात. लग्न झालंय की नाही? सिंगल की कमिटेड? अशा प्रश्नांचा भडिमार सुरु होतो आणि जर या दोन्ही प्रश्नांची उत्तर नकारार्थी असतील तर विचारूच नका..!!

अशा सिंगल' असलेल्यांच नेमकं काय होतं? त्यांना कोणत्या गोष्टींना सामोरं जावं लागतं? हे दाखवणारा ‘सिंगल’ हा धमाल मराठी चित्रपट २७ ऑक्टोबरला आपल्या भेटीला येतोय.

# उपचारांची हमी जनआरोग्यातून द्यावी

### महापालिका कामगार संघटना कृती समितीची मागणी

सुराज्य/सोलापूर

सध्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कामगार व त्यांच्या नातेवाईकांच्या उपचार खर्चाची महापालिका आयुक्तांनी हमी घेऊन प्रत्येक हॉस्पिटल व्यवस्थापकांना कळवावे आणि झालेला खर्च केंद्र व राज्य शासनाच्यावतीने जाहीर झालेल्या जनआरोग्य योजनेतून वसूल करुन घ्यावा अन्यथा तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा महापालिकाकामगार संघटना कृती समितीच्यावतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

कामगार नेते अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले. निवेदनात पुढे म्हटले आहे की, ‘महानगरपालिकेतील कामगार - कर्मचाऱ्यांना त्यांचे कुटुंब आजारी पडल्यानंतर त्यांनी केलेला उपचार खर्च वैद्यकीय प्रतिपूर्ती रुपाने संपूर्ण खर्चाच्या ८० टक्के रक्कम मिळत होती. आता राज्य शासनाने महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या रेशनकार्डधारक नागरिकांसह कामगार कर्मचाऱ्यांनी महात्मा ज्योतीराव फुले, जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत पंतप्रधान जनआरोग्य योजना या योजनेद्वारे कोणत्याही गंभीर आजाराच्या उपचारासाठी पाच लाख देण्याची योजना जाहीर झाली. परंतु अद्याप त्याचा अंमल सुरु झालेला नाही. सद्यस्थितीत अनेक कामगार व त्यांचे नातेवाईक वेगवेगळ्या हॉस्पिटलमध्ये वेगवेगळ्या गंभीर आजाराने उपचार घेत आहेत. पैशाअभावी त्यांचे उपचार सुध्दा थांबलेले आहेत. अनेकजण मृत्यूशय्येवर आहेत. या गंभीर परिस्थितीचा विचार करून कार्यवाही करावी अन्यथा तीव्र आंदोलन करावे लागेल, असे निवेदनात नमूद केले आहे. यावेळी अशोक जानराव, प्रदीप जोशी, शशिकांत शिरसट, बाबासाहेब क्षीरसागर, बाली मंडेपू, लिंबराज जेटीथोर, दत्ता तुळसे, भारत क्षीरसागर, अंबादास डावरे, कामगारवर्ग उपस्थित होता.



## ऑल इंडिया पँथर सेना निवडणुका स्वबळावर लढविणार

**सोलापूर** : ऑल इंडिया पँथर सेना आगामी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका स्वबळावर लढणार आहे, अशी माहिती ऑल इंडिया पँथर सेनेचे पदाधिकारी अमर कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुसे सावळी गावात घडलेल्या घटनेची सखोल चौकशी होऊन कठोर कारवाईची मागणीही ऑल इंडिया पँथर सेनेने आहे. या पत्रकार परिषदेस शोभा ससाणे, अजय प्रक्षाळे, तसनीम शेख, राहुल गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## वसुंधरा महाविद्यालयात व्याख्यानमालेचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

वसुंधरा कला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा आणि करिअर गाइडन्स सेल अंतर्गत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजे समाजसेवेची संधी असते. स्वतः चा आत्मविश्वास वाढवून संयमाने निराश न होता परीक्षेला सामोरे जावे. त्यासाठी नियोजनबद्ध अभ्यासाची गरज असते, असे अनअकॅडमीचे चीफ एज्युकेटर सौरभ सोनवणे यांनी यावेळी सांगितले. यावेळी सुजित श्रीगौरव यांनीही स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय आढाव्यात प्राचार्य डॉ. मीना गायकवाड यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्त्व विशद केले.

प्रास्ताविक डॉ. संगीता भोसले यांनी केले. आभार डॉ. सुहास उघडे यांनी मानले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय मुल्ला यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. बापू राऊत केले.

## सोन्या मारुतीच्या ‘बाप्पाला’ नव्या आभूषणांचा साज

### २१ किलो चांदी, ९ तोळे सोने, विविधरंगी खंबानी खड्यांचा वापर

सुराज्य/सोलापूर




सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या तसेच हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतिक मानल्या जाणाऱ्या श्री सोन्यामारुती गणेशोत्सव मंडळाच्या ‘श्रीं’च्या मूर्तीस यंदाच्या वर्षी २१ किलो चांदी, ९ तोळे सोने आणि विविध रंगाच्या खंबानी खड्यांचा वापर करुन निर्माण करण्यात आलेल्या अत्यंत सुबक व आकर्षक अशा आभूषणांचा साज चढविण्यात येणार असल्याची माहिती मंडळाच्यावतीने शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

शहरातील नावाजलेल्या अग्रगण्य मंडळांपैकीच एक म्हणून श्री सोन्यामारुती मंडळाची ओळख निर्माण झालेली आहे. सन १९४७ साली प्रखर हिंदुत्ववादी नेते धर्मवीर वि. रा. पाटील, देशभक्त डॉ. कृ. भ. अंत्रोळीकर, माणिकराव महिंद्रकर, प्रल्हाद ऊर्फ पलोबा सिदवाडकर यांच्या प्रेरणेमधून मंडळाची स्थापना केली. त्यांच्यानंतर याच दिग्गज व मान्यवर मंडळींच्या घरच्या तसेच मित्रपरिवारांच्या पुढच्या चौथ्या पिढीपर्यंतचे शिलेदार मंडळाच्या कार्याची धुरा खांद्यावर वाहून नेण्यासाठी आजसुध्दा झटत आहेत. सन १९८३ साली मंडळाने एक चार फुटी चांदीची गणेशमूर्ती तयार करून घेतली. त्यानंतर सोलापुरातील प्रतिभासंपन्न मूर्तीकार उमेश व्हरकट यांच्याकडून नव्याने ९ फूट उंचीची अत्यंत आकर्षक व रेखीव अशी गणेशमूर्ती तयार करून नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिरात सन २०१५ साली श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली. मस्जिदीच्या बाजूलाच गणपतीची स्थापना होत असलेले हे एकमेव मंडळ आहे.

या पत्रकार परिषदेस ज्येष्ठ सल्लागार मोहन वडगावकर, उत्सव अध्यक्ष विजय पेठकर, कार्याध्यक्ष राजू कुरेशी, रामभाऊ तडवळकर, सुहास महिंद्रकर, विनायक महिंद्रकर, श्रीकांत अनगरकर, निलेश महिंद्रकर, अभिजीत वडगावकर आदी उपस्थित होते.

# भारतीय-अमेरिकन ११ नागरिकांची किलीमांजारो शिखरावर चढाई

सुराज्य/सोलापूर




एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे याने आपल्या ३६० एक्सप्लोरर ग्रुपमार्फत आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माऊंट किलीमांजारो दुसऱ्या वेळेस सर केले असून या मोहिमेत भारतीय वंशाच्या ११ अमेरिकन नागरिकांनीही शिखरावर चढाई केली आहे. आनंदने २०२१मध्ये युरोपातील सर्वोच्च शिखर दुसऱ्या वेळेस सर केले होते, आता आफ्रिकेतील टांजानिया या देशामध्ये असलेले किलीमांजारो हे शिखर दुसऱ्या वेळेस सर करून एका नव्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

आनंद बनसोडे यांनी आतापर्यंत ४ खंडातील जसे आशियातील माउंट एव्हरेस्ट (२०१२), युरोपातील माउंट एलब्रूस, (२०१४ व २०२१), आफ्रिकेतील माउंट किलीमांजारो (२०१४ व २०२३), ऑस्ट्रेलियातील माउंट कोझिस्को (२०१४) अशी शिखरे सर केली आहेत. सोलापूरमधून गिर्यारोहणाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना लहान वयात आनंदने गिर्यारोहणातील अत्यंत खडतर प्रशिक्षण पूर्ण करून २०१२ साली सोलापूरच्या पहिला एव्हरेस्टवीर होण्याचा मान मिळवला.

२०१५ साली अलास्का येथे मोहिमेवर असताना आनंदच्या वडिलांचे निधन झाले होते. त्यानंतर मणक्याच्या आजाराने कित्येक महिने आनंद अंथरुणाला खिळला होता.

स्वतःच्या ३६० एक्सप्लोररमार्फत पुन्हा एकदा आनंद ही सर्वोच्च शिखरे सर करत आहे. किलीमांजारो हे टांझानिया देशातील शिखर असून याची उंची समुद्रसपाटीपासून १९००० फुटावर आहे.

### सोलापूरात विमानसेवेची मागणी

माउंट किलीमांजरो शिखरावर सोबत असणाऱ्या गाईड व पोर्टरमार्फत एक मराठी भाषेत व्हिडीओ बनवून सर्वांनी सोलापुरात लवकरात लवकर विमानसेवा सुरू करावी असा व्हिडीओ बनवला आहे. तो व्हिडीओ सोलापूरात व्हायरल झाला आहे.

### बे एरिया ते काय बे एरिया

आनंद जगात कुठेही गेला तरी सोलापूरचे मार्केटिंग करत असतो. अमेरिकेतील सॅन फ्रांसिस्को भागाला बे एरिया असे म्हणतात. एव्हरेस्टवीर आनंदने यावेळी काय बे एरिया अमेरिका फ्रॉम सोलापुरी ३६० एक्सप्लोरर असा बॅनर बनवून अमेरिकन लोकांना सोलापुरी भाषेची ओळख करून दिली.

## गोदूताई परुळेकर नगर गणेशोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या अध्यक्षपदी अनिल कुडक्याल

सुराज्य/सोलापूर

गोदूताई परुळेकर महिला गृहनिर्माण संस्था येथील मुख्य कार्यालय येथे मावळते अध्यक्ष मनोज महेशन यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारणसभा पार पडली. यावेळी निवड समितीमार्फत गोदूताई परूळेकर नगर कुंभारी सार्वजनिक गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळ २३-२४ ची निवड करण्यात आली.

कॉ. गोदूताई परुळेकर गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे नूतन अध्यक्ष म्हणून अनिल कुडक्याल यांची तर उपाध्यक्ष म्हणून शामसुंदर आडम व सचिव मधुकर चिल्लाळ, कार्याध्यक्षपदी बालाजी कोडम, खजिनदारपदी राजेश दुडम तसेच पदाधिकारी तसेच कार्यकारणी सदस्यपदी राजेश पगड्याकुल, रवी दासरी, नरेश गुल्लापल्ली, राकेश मारता, सुरेश बंडा, नितेश बोमेन यांची निवड करण्यात आली.

यावेळी अक्कलकोटचे पोलीस उपअधीक्षक विलास यामावर, वळसंगचे सहा. पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, पोलीस उपनिरीक्षक घरकुलचे उस्मान शेख, पोलीस उपनिरीक्षक वळसंगचे सागर पाटील, घरकुलचे मुख्य प्रभारी कॉ. युसुफ शेख मेजर, बापू साबळे, विक्रम कलबुर्गी, हसन शेख, आप्पाशा चांगले, मध्य. महामंडळाचे संस्थापक सदस्य कॉ. मुरलीधर सुंचू, विधी सल्लागार ॲड. अनिल वासम आदी उपस्थित होते.

# जिल्हा भाजपची ११३ जणांची जम्बो कार्यकारणी जाहीर

सुराज्य/सांगोला

**सोलापूर जिल्हा पश्चिम ग्रामीण भागात भारतीय जनता पक्षाचा विचार जिल्ह्यातील घराघरात पोहोचविण्यासाठी तसेच जिल्ह्यात भाजप पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा भाजपची कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.**

भाजपची जिल्हा पश्चिम कार्यकारिणी पुढीलप्रमाणे, विशेष निमंत्रित सदस्य- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार राजाभाऊ राऊत, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार राम सातपुते, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार जयवंत जगताप, केशव पाटील माळशिरस, हणमंत सुळ माळशिरस, राजकुमार पाटील माळशिरस, शिवाजी कांबळे माढा, सविताराजे भोसले करमाळा, शिवाजीराव गायकवाड सांगोला, संजीवनी पाटील माळशिरस, गणपतराव मिसाळ सांगोला, विठ्ठलराव शिंदे माळशिरस, अनिल कांबळे सांगोला, राजाभाऊ चवरे माढा, नागेश जोशी सांगोला, संग्रामसिंह जहागीरदार माळशिरस.

सरचिटणीस - गणेश चिवटे करमाळा, सचिन शिंदे माळशिरस, संदेश काकडे बार्शी, धनश्री खटके माढा. जिल्हा उपाध्यक्ष - बाळासाहेब वावरे खडूस , अतुल पवार सांगोला, केशव त्र्यंबक घोगरे बार्शी, संभाजी आलदर सांगोला, शशिकांत पवार करमाळा, अमोल कुलकर्णी माढा, अफसर सुरेश जाधव करमाळा, नवनाथ भोसले सांगोला, बाजीराव काटकर माळशिरस, जयसिंग ढवळे माढा, शितल लादे सांगोला, विलास रेणके बार्शी. चिटणीस - सागर मगर बार्शी, अनिता अजिनाथ लोंढे, माढा, विनोद महारनवर करमाळा, शाम सिंधी करमाळा, सागर विठ्ठल लोखंडे माळशिरस, रुपाली संतोष शेळके बार्शी, विजय बाबर सांगोला, भाग्यश्री दिवाकर कुलकर्णी करमाळा, संदीप घाडगे माळशिरस, संगीता चौगुले सांगोला, लक्ष्मण केंकान करमाळा. कोषाध्यक्ष - संजय पाटणे सांगोला.

महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष ज्योती पाटील माळशिरस, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शंभूराजे जयवंतराव जगताप करमाळा, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर माळशिरस, अनुसूचित मोर्चा जिल्हाध्यक्ष यशपाल चंद्रकांत लोंढे माढा, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष बी.वाय.राऊत माळशिरस, आदिवाशी मोर्चा जिल्हाध्यक्ष रावसाहेब शिवाजी आडसूळ बार्शी, अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्ष मुख्तार कोरबू माळशिरस.

जिल्हा कार्यकारणी सदस्य- (बार्शी) गणेश चव्हाण, अंकुर मुळे, अजय मांगडे,



रेणुका शिरीष जाधव, सांगोत संजय चौधरी, आशा सुर्यकांत लोंढे, शैलेजा विलासराव गीते, स्मिता सुरवसे. (करमाळा) अशोक धोंडीबा ढेरे, धनंजय हरिभाऊ ताकमोगे, अमोल तुकाराम जरांडे, विठ्ठलराव नारायण शिंदे, हरिभाऊ झिंजाडे, संदीपान गोरख कानगुडे, बापूसाहेब वामन तनपुरे, रुपाली सागर ननवरे, वनिता शिवाजी साळुंखे, चंपावती विलास कांबळे, सुमन नाळे, नीता घाडगे, कोमल वाघ, जयश्री वाघमारे, शांता खाडे. (माढा) आलम जमादार, दत्तात्रय ढवळे, बालाजी बारबोले, नितीन गडदरे, अप्पासाहेब दोलतोडे, हर्शल कदम, संतोष क्षीरसागर, अनिता लोंढे, सुप्रिया अनिल जाधव, शिवकन्या अनिल रसाळ, संगीता अनिल ताकमाने, सुवर्णा मदन मुंगळे, स्वाती अमोल मस्के, वंदना चौधरी, प्रताप पवार, रणजीत चंदनकर, सतीश दरगुडे, शंकर मुळूक, सुधीर गाडेकर, सुरज धोत्रे, श्रीधर शिंदे, सुहास शहा, धनाजी निवृत्ती लादे, शीतल कुमार जोकर, दत्तात्रय यशवंत जाधव, अप्पासाहेब दोलतोडे. (माळशिरस) प्रवीण शिवाजी काळे, लक्ष्मण जगन्नाथ गोरड, बाळासाहेब साहेबराव लवटे, राहुल नरहरी मदने, बाबुराव मारुती खिलारे, रामचंद्र एकनाथ नारनवर, निनाद पटवर्धन, साक्षी महेश सोरटे, दत्तात्रय रामचंद्र भिलारे, गणेश प्रभाकर पागे, देविदास कैलास चांगण, राहुल पद्मन, महेश इंगळे, शरद मदने, ज्योती सुशांत जाधव, संगीता संजय मोटे, हर्षली संजय निंबाळकर, कल्पना मिलिंद कुलकर्णी, प्रतिभा विलासनंद गायकवाड. (सांगोला) वसंत सुपेकर, नंदकुमार रायचुरे, लक्ष्मी विनोद उबाळे, अमृता किरण खडतरे, ललिता शंकर केदार, सविता दत्तात्रय नवले, आनंद फाटे, संजय गंभिरे.



### प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना संधीः केदार

भाजपची संघटना आणखीन मजबूत करण्यासाठी भाजपचे अनेक तालुक्याचे तालुकाध्यक्ष, विविध आघाड्या, सेल, मोर्चा यांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी थोड्या दिवसांत करण्यात येणार आहेत. पक्षाचे काम प्रामाणिकपणे करण्यासाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांना सेल, मोर्चा, आघाडीमध्ये काम करण्याची संधी देण्यात येणार आहे, असे जिल्हाध्यक्ष – चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.



## होटगी गाव ते स्टेशन औज रस्ता दुरुस्ती करा

**द. सोलापूर** : सोलापूर ते इंगळगी मार्गावरील होटगी गाव ते होटगी स्टेशन दरम्यानचा रस्ता अतिशय खराब झालेला असून या रस्त्यावर जागोजागी मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे नागरिकांची अडचण होत आहे. होटगी गाव ते होटगी स्टेशन - औज रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी संभाजी आरमारच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे केली आहे.

होटगी स्टेशन आणि औज या गाव परिसरात एनटीपीसी वीज निर्मिती प्रकल्प, बिर्ला, झुआरी, चेट्टीनाड कंपनींचे सिमेंट उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने ह्या सर्व कंपन्यांचे कारखाने या परिसरात आहेत. त्याचबरोबर या परिसरातील अनेक लहान मोठ्या गावांचा सोलापूरशी सोयीचा-जवळचा वाहतुकीचा हा एकमेव मार्ग असल्याने नागरी आणि शेतमालांची वाहतूकही या मार्गावर मोठ्या प्रमाणात असते. सिमेंट कारखान्यांशी संबंधित अवजड वाहतूक रात्रंदिवस चालते. अवजड सिमेंट बल्कर वाहतुकीमुळे रस्त्याची चाळणी होत आहे. होटगी गाव ते होटगी स्टेशन, औज गाव या मार्गाचे रुंदीकरण करून सदर रस्ता सिमेंट काँक्रेटीकरण करणे गरजेचे आहे, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, उपजिल्हाप्रमुख प्रमोद जगताप, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे, तालुका संघटक राजशेखर बोरेगाव, अमित कदम आदी उपस्थित होते.

## रोहित चव्हाण यांची निवड



सुराज्य/कुर्डूवाडी

महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र राज्याच्या २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय संयुक्त गट क्रमांक ब व गट क्रमांक क परिक्षा मध्ये खुल्या प्रवर्गातुन रोहित दिलीप चव्हाण रा. कुर्डुवाडी याची मंत्रालयात महसुल सहाय्यक (लिपीक टंकलेखक) या पदी निवड झाली आहे. यावेळी दिनेश जगदाळे, सागर जोंधळे, गणेश भारती, भारत लटके, सूर्यकांत जाधव, भारत शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

# अक्कलकोटमध्ये अतिक्रमण विरोधी मोहिम जोरात

## चार दिवसात ४०० अतिक्रमण उद्ध्वस्त

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट शहरात मागील चार दिवसांपासून नगरपालिका कडून अतिक्रमण विरोधी मोहमी सुरू करण्यात आली आहे. चार दिवसात ४०० अतिक्रमण उद्ध्वस्त करण्यात प्रशासनाला यश आले आहे.

संपूर्ण शहर अतिक्रमणाने व्यापून गेले होते. यामुळे पादचारी लोकांना चालणे कठीण झाले होते. पालखी सोहळा, गणेशोत्सव, दसरा, दिवाळी, मिरवणूका, आशा विविध प्रसंगी जीव मुठीत धरून साजरा करावा लागत होते. मात्र आता मागील चार



दिवसांपासून नगरपालिका व पोलीस प्रशासन हातात हात घालून युद्धपातळीवर अतिक्रमण काढत आहेत. एवन चौक, जुना पोस्ट ऑफिस, विजय कामगार चौक, पंचायत समिती परिसर, कारंजा चौक, रजिस्टर ऑफिस समोरील,एस टी स्टँड परिसर, इंदिरा नगर झोपडपट्टी, असे विविध ठिकाणचे अतिक्रमण उध्वस्त करण्यात प्रशासनाला यश आले आहे.

याकामी मुख्याअधिकारी सचिन पाटील, पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू आहे. या पथकात न. प. चे इंजिनअर मलय्या स्वामी, धनराज कांबळे, बालाजी पारखे, राजू लोखंडे, परशुराम कांबळे, मोहन पारखे, कुमार ग्वल, यांच्यासह अनेक कर्मचा सहभागी झाले आहेत. याना पीएसआय चंद्रकांत पुजारी, महिला अधिकारी चव्हाण, सिद्धाराम चव्हाण, पोहेकॉ पांढरे, शरद चव्हाण, धोंडिबा टेंगळे, केदारनाथ सुतार, चिदानंद उपाध्ये, रफिक बिराजदार, रमजान पाटील यांनी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात ठेवले आहेत.

### शंभर टक्के अतिक्रमण काढण्यात येणार

शहरातील स्वामी समर्थ मंदिर, मुरलीधर मंदिर, राम मंदिर, समाधी मठ, अंबाबाई मंदिर, बालाजी मंदिर, विठ्ठल मंदिर, राजेराय मठ, टोल अंबाबाई, हसापूर रोड, वेताळ चौक, खासबग आशा विविध ठिकाणचे मंदिरे पूर्णपणे कोंडले गेले होते. दर्शनासाठी भाविकांना जीव मुठीत धरून जावे लागत होते. न प कडून शंभर टक्के अतिक्रमण काढण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

### मोहिमेचे नागरिकांकडून स्वागत

मागील वीस ते पंचवीस वर्षांत नगरपालिका कडून किमान दहा वेळा अतिक्रमण काढण्यात आले. लाखो रुपये खर्ची टाकण्यात आले. ते सर्व पैसे पाण्यात गेले होते. सदरचे कारवाई पूर्णपणे यशस्वी कधीच झाले नव्हती. यंदा अतिक्रमण पूर्णपणे काढण्यात येत असल्याने मुख्याधिकारी सचिन पाटील, पो.नि. जितेंद्र कोळी यांचे कौतूक होत आहे.



## दक्षिण तालुक्यातील शाळांना सॅनिटरी पॅड पूरक मशिनचे वाटप

**सोलापूर** : दक्षिण सोलापूर येथील ७० शाळांना लोकमंगल फौंडेशनच्यावतीने पर्यावरण पूरक सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीनचे वाटप आ.सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या मशीनचा वापर सगळ्या शाळांमध्ये करण्यात यावा असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी लोकमंगल बँकेचे संचालक व लोकमंगल फाउंडेशन चे प्रल्हाद कांबळे यांनी लोकमंगल फाउंडेशन च्या माध्यमातून शाळेच्या शिक्षकांनी आपल्या शाळेच्या परिसरात पाच खड्डे करावे व फाउंडेशनला कळवावे असे सांगितले.. या कार्यक्रमास ग्लेनमार्क कंपनीचे बेलदार यांनी सीएसआर फंडातून हे मशीन उपलब्ध करून देण्यामागचे कारण आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी सुयेश गुरुकुलचे मुख्याध्यापक केशव शिंदे सर यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन यांनी विद्यार्थिनींना पिरेडसमध्ये येणाऱ्या समस्या आणि सॅनिटरी पॅड डिस्पोजेस मशीन वापरण्याचे फायद सांगितले. आभार सोमेश्वर लवंगे यांनी केले.

## मंगळवेढ्यात सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढून दहन

सुराज्य/मंगळवेढा

मराठा आरक्षणाच्या संदर्भातील निर्णय होत नसल्यामुळे मंगळवेढा येथील सकल मराठा समाजाच्या वतीने वेगवेगळ्या माध्यमातून आंदोलनात सुरुवात केली असून सरकारची प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढून दामाजी चौकात त्यांचे दहन करण्यात आले.

श्री संत दामाजी पुतळा परिसरापासून सकल मराठा समाजाच्या वतीने सरकारने आरक्षण देण्यास विलंब केला जात आहे व विद्यमान विरोधी पक्ष देखील पाठीमागील काळात सत्तेत होते त्यांनी देखील या आरक्षणाकडे दुर्लक्ष केल्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. दामाजी पुतळ्यापासून शिवप्रेमी चौक, चोखामेळा चौक, मुरलीधर चौक, या मार्गावरून प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढून दामाजी चौकात त्याचे दहन करण्यात आले. यावेळी निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. मंगळवारी शहरातील एसटी बस स्थानक,शाळा, महाविद्यालय,बँका,पतसंस्था,साखर कारखाने,शासकीय, निमशासकीय कार्यालयाचे कामकाज बंद ठेवून यामध्ये सहभाग नोंदवला. गुरूवारी अंत्ययात्रा काढून त्याचे दहन केले असले तरी हे आंदोलन रविवार पर्यंत चालणार असल्याचे सांगण्यात आले.

## शहरातील खड्ड्यांची त्वरित दुरूस्ती करा

### अक्कलकोट युवक काँग्रेसची मागणी

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट संपुर्ण शहरभरात व मुख्य रस्त्यावरती पूर्णतः खड्डेच खड्डे पडलेले आहेत.तरी येणारा गणेशोत्सव,गौरी,इद ए मिलाद, या सणांमध्ये शहरात नागरिकांच गर्दी-वर्दळ मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यासाठी तत्काळ खड्डे बुजवून घेण्याचा विनंती युवक काँग्रेसच्या वतीने नगरपरिषद प्रशासनकडे करण्यात आली.याचे निवेदन अक्कलकोट नगरपरिषद मुख्याधिकारी सचिन पाटील यांना देण्यात आले.

यावेळी अक्कलकोट शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष मुबारक कोरबु,अक्कलकोट युवक ता अध्यक्ष बाबासाहेब पाटील, अतिक बागवान,राहुल मोरे, सरफराज शेख, मुदस्सर शेख, जाहीर मुजावर, जब्बार बागवान,विलास राठोड,बसवराज अल्लोळी, शिवशरण इचगे, आकिब शेरीकर, इंद्रजीत गद्दी, गुरू म्हेत्रे, बालाजी शापवाले, राहुल भकरे, असिफ राजू मुल्ला जमादार, अझहर जंगी, रियाज विजापुरे, तन्वीर सुतार, शबाब मुजावर अतिक अन्सारी, विकी कोरे,सतिश चिंचोळी मजीद कोरबू आदींसह युवक काँग्रेस कार्यकर्ते बहुसंख्येत उपस्थित होते.



## घरासमोरून दुचाकी लंपास

**सोलापूर** : घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.ऐयू.०६१२ ही चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि.१४ सप्टेंबर रोजी रात्री ५६ गाळा रविवार पेठ येथे घडली.

याप्रकरणी मल्लिकार्जुन अशोक कलशेट्टी यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक बाबर हे करीत आहेत.

## जनार्दन सांगळे यांचे निधन



**सोलापूर** : दमानी नगर येथील गड दर्शन सोसायटीचे ज्येष्ठ सदस्य जनार्दन बाबुराव सांगळे ( वय ७८ ) यांचे शुक्रवारी पहाटे वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सकाळी कोयना नगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून आणि नातू असा परिवार आहे.

## धनगर समाजाचा एसटीमध्ये समावेश करण्याची मागणी

### यशवंत सेनचे चौंडी येथे उपोषण सुरू

सुराज्य/पिलीव

शासनाने धनगर समाजाचा अनुसुचित जमातीमध्ये ( एसटीमध्ये) समावेश करावा यासाठी संसदेच्या आगामी विशेष अधिवेशनात अध्यादेश काढावा यासाठी यशवंत सेनेच्या वतीने ६ सप्टेंबरपासून चौंडी येथे अण्णासाहेब रुपनवर व सुरेश बंडगर या समाजबांधवांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. नवव्या दिवशीही राज्य सरकारने याची कसल्याही प्रकारची दखल घेतली नाही.

सध्या महाराष्ट्रात धनगर समाज बांधव आरक्षणासाठी आक्रमक होत असल्याचे दिसत आहे माळशिरस याठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. चौंडी येथे सुरू असलेल्या उपोषणाला आतापर्यंत आ. रोहित पवार, खा सुप्रिया सुळे, राम शिंदे, माजी आमदार रामहरी रुपनर,चिमण डांगे,माजी आमदार नारायण पाटील, होळकर घराणयाचे वंशज राजे भुषणसिह होळकर, धनगर समाज कृती समीतीचे अध्यक्ष हनुमंत सुळ,पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष नानासाहेब देवकाते, नातेपूतेचे सभापती अतुल पाटील यांनी पाठींबा दर्शविला. धनगर समाज आरक्षणासाठी या अगोदर २०१४ साली बारामती येथे झालेले आंदोलन त्यावेळी तत्कालीन भाजपचे प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी आपण मुख्यमंत्री झाल्यास पहिल्याच मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा प्रश्न मार्गी लावणार असे आश्वासन दिले होते पण ते पाच वर्ष मुख्यमंत्री होऊनही त्यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे धनगर समाजामध्ये असंतोषाचे वातावरण आहे.

# दिंडूर येथील ग्रामदैवत नागनाथ देवस्थान येथे श्रावणपर्व समाप्ती उत्सव

सुराज्य/अक्कलकोट

दक्षिण सोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र दिंडूर येथील ग्रामदैवत श्री नागनाथ देवस्थान येथे सालाबादाप्रमाणे यंदा ही श्रावणपर्व समाप्ती उत्सव उत्साहाने साजरा होत आहे.

येथील परमपूज्य श्री श्री श्री.धानलिंगेश्वर महाराजांच्या संकल्पनेनुसार मागील ५९ वर्षांपासुन श्री नागनाथ देवस्थान येथे वीणाधारणा या पवित्र उपक्रमांची परंपरा नित्यनेमाने चालू आहे. दरवर्षी संपूर्ण श्रावण महिन्यात वीणाधारणा, भजन, भारूड असे दैनंदीन उपक्रम होत असतात. श्रावण महिन्याच्या आमवस्येनंतर भाद्रपदमधील पहिल्या रविवारी जागरण कार्यक्रम व सोमवारी श्रावणपर्व समाप्ती साजरा केला जातो. या भव्य उत्सवाकरिता अनेक हरिभजन मंडळ, पारिजात भजन मंडळे पालख्या उपस्थित राहून उत्सवात भाग घेतात.



तरी श्री.धानलिंगेश्वर महाराजांच्या कृपाशिर्वादाने सालाबादाप्रमाणे यावर्षी ही श्रीक्षेत्र दिंडूर येथे श्रावणपर्व समाप्ती उत्सव मंगलमय वातावरणात मोठ्या उत्साहाने साजरा होत असून, १७ सप्टेंबर २०२३ रोजी सायं. ६ ते १० वाजेपर्यंत भजन मंडळे, पालख्या दिंड्यांचे दिंडूर येथे आगमन, रात्री जागरण भजन भारूडचे कार्यक्रम. दि १८ सप्टेंबर २०२३ रोजी पहाटे पाच वाजता श्री नागनाथाचे रुद्राभिषेक, सकाळी नऊ वाजता गावातून भजन कार्यक्रम,दिंड्यासमवेत पालखीचे मिरवणूक त्यानंतर ठीक ११:३० वाजता वारकरी संप्रदाय यांच्या हस्ते दहींहंडी काल्याचे कार्यक्रम होणार आहे. भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा व भजनी मंडळे दिंड्यासमवेत भक्तगणांनी बहुसंख्येने उपस्थित राहुन शोभा आणावी व सुसंधींचा लाभ घ्यावा.असे आवाहन श्री.धानलिंगेश्वर सार्वजनिक विश्वस्त मंडळ व श्री नागनाथ हरिभजन मंडळ, दिंडूर यांनी केले आहे.

सुराज्य Classified
पाहिजेत
व्यंकटेश्वरा मॅटर्निटी होम- सिस्टर, मावशी पाहिजेत.
मो. नं. ९४०५५४४७२२,
(210923)

## पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्रात आयुष्यमान भव योजनेचा प्रारंभ

सुराज्य/पिलीव

केंद्र व महाराष्ट्र शासनाची महत्त्वकांक्षी आयुष्यामान भव योजनेचा पिलीव येथे नुकताच उपसरपंच सोनाली करमाळकर, माजी उपसरपंच संजय आर्वे, ग्रामविकास अधिकारी बाबर,वैद्यकीय अधिकारी डॉ विलास जाधव व डा अक्षता वाघमारे आदींच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.

ही योजना १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत सदरची योजना राबविण्यात येणार आहे. यामध्ये असंसर्गजन्य आजार,कुष्ठरोग, क्षयरोग, माता बालक लसीकरण ,आयुष्यमान व आभा कार्ड बाबत जनजागृति करणयात येणार आहे. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव यांनी या मोहिमेत राबविण्यात येणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती दिली. या मोहीमेत मधुमेह व रक्तदाब



यांचे निदान व उपचार, कनसर निदान व संदर्भ, प्रभावी माता बालक लसीकरण, रक्तक्षय निदान व उपचार, क्षयरोग व कृषठरोग निदान व उपचार, आयुष्यमान योजनेअंतर्गत पाच लाखापर्यंत मोफत उपचार ,मुख्यमंत्री सहायता निधीतुन मदत निधी व यासाठी पात्र रुगणालये याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच शासनाच्या विविध योजनेतुन सुद्धा लाभ घेण्यात येतो यामध्ये प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, जननी सुरक्षा योजना, कन्याकल्याण योजना, दुर्धर आजार योजना याविषयी माहिती देणयात आली तसेच स्वचछता मोहीम, अवयव दान जागृती,अंगणवाडी व प्राथमिक शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी,१८ वर्षापुढील नागरिकांची तपासणी, सदरच्या शिबीरात १०० नागरिकांची मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड, बिपीची तपासणी करध्यात आली. यावेळी अवयवदान व तंबाखु विरोधी शपथ देण्यात आली.

## महत्त्वाचे वृत्त...

### मुंबईतील सहा नामकिंत हॉटेल्सना टाळे

**मुंबई :** पाली येथील 'पापा पन्चो दा ढाबा' या हॉटेलमध्ये एका व्यक्तीला जेवणामध्ये मृत उंदीर सापडल्यामुळे खळबळ उडाली होती. या प्रकरणाची दखल घेऊन अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) शहरातील हॉटेल्सवर कारवाईचा बडगा उगारायला सुरुवात केली आहे. गेल्या १५ दिवसांमध्ये एफडीएने ७० हॉटेल्सविरोधात कारवाई केली असून नियमांची पूर्तता करेपर्यंत सहा नामांकित हॉटेल्सना व्यवसाय बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या हॉटेल्समधील जेवण बनविण्याची पद्धत, स्वयंपाकघर, साफसफाई, कर्मचाऱ्यांची स्वच्छता, पिण्याचे पाणी या बाबींची तपासणी एफडीए करीत आहे.

### भिडे गुरुजींविरोधात तुषार गांधी न्यायालयात

**पुणे :** महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी श्री शिवप्रतिष्ठानचे संभाजी भिडे यांच्याविरुद्ध न्यायालयात दावा दाखल केला आहे. भिडे यांनी महापुरुषांविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध गांधी यांनी नुकतीच डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. गांधी यांच्याकडून दाखल केलेल्या तक्रारींवर पोलिसांनी कारवाई न केल्याने त्यांनी शिवाजीनगर न्यायालयात ड. असीम सरोदे यांच्यामार्फत तक्रार दाखल केली आहे. गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी, सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी, अन्वर राजन, मेधा पुरव-सामंत, युवराज शहा यांनीही तक्रार दाखल केली आहे.

### नाल्यात पडून एकाच मृत्यू

**मुंबई :** प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करताना एक व्यक्ती पाय घसरून गुरुवारी विक्रोळीमधील नाल्यात वाहून गेली. शोध मोहिमेदरम्यान शुक्रवारी या व्यक्तीचा मृतदेह अग्निशमन दलाच्या जवानांना सापडला. पार्कसाईट पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. विक्रोळी पार्क साईट परिसरात वास्तव्यास असलेले प्रशांत सोनवणे (३४) आणि त्यांचा मित्र राहुल सुरवसे (४४) गुरुवारी सायंकाळी विक्रोळीमधील संगम नगर परिसरातील नाल्यातून प्लास्टिकच्या बाटल्या जमा करीत होते.

### साकीनाका येथे ३६ वर्षीय व्यक्तीची हत्या

**मुंबई :** ताडी पिण्यावरून झालेल्या वादातून साकिनाका येथे एका व्यक्तीची हत्या करण्यात आली. आरोपीने मृत व्यक्तीच्या डोक्यावर ताडीची बाटली मारली, त्यानंतर फुटलेली बाटली मृत व्यक्तीला भोसकल्याचे प्राथमिक तपासणीत निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी साकिनाका पोलिसांनी ४० वर्षीय आरोपीला अटक केली आहे. खुर्शीद उर्फ रिझवान शेख (३६) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तो कुर्ला पश्चिम येथील जरीमरी परिसरातील रहिवासी होता.

### दिल्लीतील फॅशन डिझायनरवर मुंबईत बलात्कार

**मुंबई :** फिरण्यासाठी मुंबईत आलेल्या दिल्लीतील फॅशन डिझायनरवर तिच्या व्यावसायिक मित्रानेच बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तिने यासंदर्भात खार पोलिसांत तक्रार दाखल केली असून आरोपीविरोधात भारतीय दंड विधान विविध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फॅशन डिझायनर मुंबईत पहिल्यांदाच आली असल्याने तिने तिच्या मित्राकडे राहण्याचा निर्णय घेतला. खार येथे राहणाऱ्या तिच्या व्यावसायिक मित्राच्या घरी ती राहिली. मात्र, मित्राने तिचा विश्वासघात केला. या मित्राने तिच्यावर बलात्कार करून तिला मारहाण केल्याचा आरोप तिने केला आहे.

### पुण्यातील दोन महिलांचे खंडणीसाठी अपहरण

**पुणे :** सतरा लाख रुपयांच्या खंडणीसाठी शहरातील दोन महिलांचे अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उत्तमनगर परिसरात घडली, गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने तपास करुन गुंडासह साथीदारांना अटक केली. गुंडांच्या तावडीतून दोन महिलांची सुटका करण्यात आली. बाबुलाल लक्ष्मण मोहोळ (वय ४५, सरडे बाग, उत्तमनगर), अमर नंदकुमार मोहिते (वय ३९, रा. गणेश नगर), प्रदीप प्रभाकर नलवडे (वय ३८, रा. भूगाव)स अक्षय मारूती फड (वय २४, रा. वारजे) अशी अटक करण्यात आलेल्या गुंडांची नावे आहेत.

# स्मशानभूमित ना आत्मा... ना चेटकीण... ना भूत...

## अमावस्येच्या रात्री स्मशानभूमित अंनिसकडून वाढदिवस

**सुराज्य/सोलापूर**



स्मशानभूमित ना आत्मा... ना चेटकीण... ना भूत... असं काहीही नसतं. असते ती निरव शांतता... जळत असलेलं प्रेत... दुसरं काय?. का...कुणाला... कशाला घाबरतायं. अमावस्या असो वा पौर्णिमा कधीही रात्री अपरात्री जाऊ या आणि वाढदिवस साजरा करण्याचा बेत आखूया, असा संदेश जूण सोलापूर अंधश्रध्दा निर्मूलन समितीने सोलापूरकरांना दिला आहे. एवढेच नाही तर रविवार पेठेतील हिंदू स्मशानभूमित अंनिसने स्मशानसहल आयोजित करुन तेथे वाढदिवस साजरा केला.

सोलापुरात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शाखेच्या वतीने गुरुवारी रात्री अमावस्येला स्मशान सहल आयोजित करण्यात आली होती. अंनिसच्या वतीने स्मशानभूमीत वाढदिवस साजरा करण्यात आला. अमवस्येला भयंकर असा अंधार असतो आणि अमावस्या असताना स्मशानभूमीबाबत अनेकांच्या मनात भीती असते. अमावस्या असो किंवा पौर्णिमा असो, स्मशानभूमीत काहीही नसते, याबाबत अंनिसने जनजागृती केली.

या स्मशानसहलीला मोठा प्रतिसाद मिळाला होता. अंधश्रध्दा निर्मूलन समितीने स्मशानभूमीत वाढदिवस देखील साजरा करत, अनेक बाबींचा उहापोह केला. स्मशानभूमी बाबत अनेकांच्या मनात , भूत, आत्मा, चेटकीण, डायन अशा भीतीदायक गोष्टी आहेत. ही भीती नाहीशी करण्यासाठी स्मशानसहल आयोजित करण्यात आली होती.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी हिंदू स्मशानभूमीत मध्यरात्री वाढदिवस साजरा केला. अमावस्या असेल तर अनेक नागरिक स्मशानभूमीत जात नाहीत किंवा त्यांच्या मनात नकारात्मक माहिती दडली आहे. ही नकारात्मक बाहेर काढण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने स्मशानभूमीत विविध उपक्रम केले. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी स्मशानभूमीत केक आणून खाल्ला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शाखेच्या वतीने अक्कलकोट रोड येथील सार्वजनिक स्मशानभूमीत विविध जादूचे प्रयोग सादर करून जनजागृती करण्यात आली. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ब्रह्मानंद धडके यांचा रात्री बारा वाजता स्मशानभूमीत वाढदिवस साजरा करून वेगळा संदेश देण्यात आला.

अमावस्येच्या रात्री स्मशानभूमीत भुते दिसतात, स्मशानभूमीत नकारात्मक ऊर्जा असते, भुताचे पाय उलटे असतात, आधी प्रश्नांवर लोकांना माहिती देऊन विविध जादूचे प्रयोग करण्यात आले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या या स्मशान सहल कार्यक्रमाला विविध मान्यवर उपस्थित होते.अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याध्यक्ष डॉक्टर अस्मिता बाळगावकर, प्रधान सचिव ब्रह्मानंद धडके, कार्याध्यक्ष शंकर खलसोडे , श्रीमती भोसले, लोखंडेकर , विजय जाधव , सना जोशी, धनाजी राऊत , उषा धडके, यशवंत फडतरे, अनिल धडके आदी उपस्थित होते.

### भानामतीचे प्रयोग सादर करत हातचालीखे धडे सादर केले

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी जनजागृती कार्यक्रम घेतला. मांत्रिक हे हातचलाखी करत लोकांना भूलथापा मारत त्यांची लुबाडणूक करतात. जादूचे कारनामे दाखवून चमत्कार करतात. मांत्रिका प्रमाणे चमत्कार आणि जादूचे प्रयोग अंनिसच्या कार्यकर्त्यांनी अमावस्येला मध्यरात्री हिंदू स्मशानभूमीत करून दाखवले. नारळामधून बांगडी काढणे, लाल कापड काढणे, रिकाम्या पातेल्यातून पाणी काढून लोकांची कशी फसवणूक करतात याचे प्रयोग दाखवण्यात आले. गोमूत्र नारळावर टाकून आग लावण्याचा प्रयोग देखील दाखवण्यात आला. यावेळी भानामतीला लागणाऱ्या वस्तू,लिंबू,नारळ आदी साहित्य घेऊन अनिसने जनजागृती केली.

# ईडीचे मुंबईसह देशभरात ३९ ठिकाणी छापे

## ४१७ कोटींची मालमत्ता जप्त, सेलिब्रिटींनीही हवालामार्फत पैसे स्वीकारले

**सुराज्य/मुंबई**

सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) मेसर्स महादेव ऑनलाइन बुक बेटिंग प संबंधित प्रकरणात कोलकाता, भोपाळ व मुंबई येथील ३९ ठिकाणी छापे टाकले असून याप्रकरणी सुमारे ४१७ कोटी रुपये किंमतीची मालमत्ता गोठवण्यात अथवा जप्त करण्यात आल्याची माहिती ईडीकडून देण्यात आली आहे. या कंपनीचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर याचे यूएईमध्ये फेब्रुवारी २०२३ मध्ये लग्न झाले होते. या विवाह सोहळ्यासाठी २०० कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे. गंभीर बाब म्हणजे या विवाह सोहळ्यात सादरीकरण करण्यासाठी १४ चित्रपट कलाकार व गायकांनी हवालामार्फत रक्कम घेतली होती.

ईडीने याप्रकरणी मुंबईसह विविध राज्यात ३९ ठिकाणी छापे टाकले आहेत. ईडीने महादेव ऑनलाईन बेटींग पशी सबंधित ठिकाणी छापे टाकले असून त्यात मुंबईसह भोपाळ, कोलकाता परिसरातील ठिकाणांचा समावेश आहे. छत्तीसगडमधील रहिवासी असलेले रवी उप्पल आणि सौरभ चंद्रकार हे महादेव बेटींग पचे प्रवर्तक असून या कारवाईमध्ये तब्बल ४१७ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकार सध्या ईडीच्या रडारवर आले असून अभिनेता टायगर श्रॉफ, नेहा कक्कर, सनी लिओनी, कृष्णा अभिषेक, राहत फतेह अली खान, विशाल ददलानी यांनी दुबईमधील लग्नात सादरीकरण केले होते.

त्यामुळे तेही याप्रकरणात ईडीच्या रडावर आले आहेत. याशिवाय भारती सिंग, नुसरत भरुचा, आतिफ अस्लम यांचीही नावे तपासात उघड झाली आहेत. संशयींत कलाकारांनी हवालामार्फत पैसे स्वीकारल्याचा संशय आहे. त्यांना याबाबत माहिती होती का याची पडताळणी करण्यासाठी यापैकी अनेकांवर ईडी लवकरच समन्य बजावणार आहे. योगेश पोपट नावाच्या व्यक्तीच्या माध्यमातून हवाला रैकेट चालवले जात असल्याचे ईडीच्या तपासात उघड झाले आहे. गोविंद केडिया नावाच्या व्यक्तीच्या घरी १८ लाख रुपयांची रोख रक्कम आणि १३ कोटी रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने ईडीला सापडले आहेत.

# ही कंत्राटी पदभरती तात्पुरतीच : उपमुख्यमंत्री अजित पवार

**सुराज्य/पुणे**

राज्याच्या काही विभागांमध्ये तातडीने पद भरती करणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्य सरकारने विविध विभागांमध्ये कंत्राटी स्वरूपात पद भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, कंत्राटी पदभरतीचा निर्णय तात्पुरत्या स्वरूपाचा आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सांगितले.

पुणे येथील श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड येथील कार्यक्रमात ते बोलत होते. पवार म्हणाले, 'कंत्राटी पदभरतीचा निर्णय महाविकास आघाडी सरकाच्या काळात घेण्यात आला होता. त्यामुळे विरोधकांनी टीका करू नये. कायमस्वरूपी पद भरती होईपर्यंत कंत्राटी भरती करण्यात येणार असल्याने शासकीय सेवेसाठी तयारी करणाऱ्या तरुणांनी काळजी करू नये. राज्य सरकारच्या विविध विभागामंध्ये सध्या सुमारे दीड लाख पदभरती करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोग्य, वैद्यकीय, शिक्षण आदी विभागांमध्ये तातडीने पद भरती करणे अपेक्षित असते. कायमस्वरूपी पद भरती होईपर्यंत जागा रिक्त ठेवता येत नाही. त्यामुळे अशा ठिकाणी कंत्राटी पदभरती करण्यात येणार आहे. 'राज्यातील काही शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे. त्यामुळे सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना तात्पुरत्या स्वरूपात सेवेत घेण्यात आले आहे' असेही पवार म्हणाले.

# गोकुळची सर्वसाधारण सभा; मात्र आधीच सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने



**सुराज्य/कोल्हापूर**

गेल्या काही दिवसांपासून चर्चेचा विषय ठरलेली गोकुळ दूध महासंघाची सर्वसाधारण सभा आता राजकीय शक्तिप्रदर्शनाचा आखाडा बनतेय की काय? असं चित्र निर्माण झालं आहे. सर्वसाधारण सभेआधीच महासंघातील सत्ताधारी सतेज पाटील गट व विरोधक शौमिका महाडिक गटामध्ये आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण रंगल्याचं पाहायला मिळालं होतं. आता पुन्हा एकदा त्यावरून वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. गोकुळ शिरगावमधील पंचतारांकित वसाहतीमधल्या मैदानात महासंघाची ६१ वी सभा होत असून तिथे गोंधळ झाल्याचं पाहायला मिळत आहे.

गोकुळ दूध महासंघाच्या निवडणुकीपासून या राजकीय सुंदोपसुंदीची कायमच चर्चा राहिली आहे. महासंघावर सतेज पाटील गटाचं वर्चस्व असून महाडिक गट विरोधात आहे. मात्र, सतेज पाटलांना फक्त महाडिकांचे टँकर व ठेका या दोन गोष्टी सोडून गोकुळबद्दल फारसं काही माहिती नाही, अशा प्रकारची टीका शौमिका महाडिक यांनी केली होती. त्यामुळे सर्वसाधारण सभेआधीच वातावरण तापलं होतं. सभेच्या निमित्ताने दोन्ही बाजूंनी स्वतंत्रपणे दौरे आयोजित करून सभासदांच्या भेटीगाठी घेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आज सर्वसाधारण सभा सुरू झाल्यानंतर महाडिक गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचं दिसून आलं. या कार्यकर्त्यांनी सभास्थळी लावलेले बॅरिकेट्स तोडून आत जाण्याचा प्रयत्न केल्याचाही दावा करण्यात येत आहे. यासंदर्भात बोलताना शौमिका महाडिक यांनी महासंघातील सत्ताधारी सतेज पाटील गटावर गंभीर आरोप केले आहेत. आत असणारे निम्म्याहून अधिक सभासद बोगस आहेत.

# गरीब-कष्टकरी- युवा वर्गाचे आशास्थान : महेश(दादा) शावरी

**अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गीचे सामाजिक कार्यातील नेते महेश(दादा) शावरी यांचा आज (शनिवारी) वाढदिवस आहे. त्यानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा हा आढावा...**

आपल्याजवळ जे आहे, त्यातून गरीब, कष्टकरी आणि वंचित घटकांना मदत करणे हा खरा दानशूरपणा आहे. मैंदर्गी (ता.अक्कलकोट) येथील एक तरूण समाजकारणाचे ध्येय उराशी बाळगून आपल्या मायभूमीत पुन्हा आला आहे. त्यामुळे या मैंदर्गी शहरातील युवा वर्ग आणि समाज त्या युवकाकडे मोठ्या अपेक्षेने पहात आहे. मैंदर्गी गावातील महेश (दादा) शावरी हाच तो तरुण. एम.एस.युथ फाऊंडेशन व बसवेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट या नावाची संस्था स्थापन करून हा युवक मदतीच्या रुपातून सर्वसामान्य महिला व गरीब-कष्टकऱ्यांना सावली देत आहे. तर भरकटलेल्या तरुणांना जीवनाचा खरा 'मार्ग' दाखवत आहे, विकासात्मक दूरदृष्टी ठेवून समाजाच्या उन्नतीसाठी सतत कार्यमग्न राहणाऱ्या या तरुणाचे व्यक्तीमत्व मैंदर्गी शहरासह अक्कलकोट तालुक्याच्या सामाजिक पटलावर युवा नेतृत्व म्हणून पुढे येते आहे. त्याबद्दल समाजाच्या विविध घटकांमध्ये आनंदाचा माहोल आहे. समाजकारण- राजकारण हे दोनही क्षेत्र पैसा कमावण्याचा उद्योग नसून समाजाच्या उन्नतीचा तो आश्वासक मार्ग आहे. ही विचारसरणी अंगी बाळगणारे महेश(दादा) शावरी हे अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी शहरातील तरुणांना आपलंसं वाटणारं युवावर्गाचे आशास्थान व्हावेत, हीच अपेक्षा त्यांच्या वाढदिवसानिमित्त व्यक्त केली जात आहे.

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील एम.एस. युथ फाऊंडेशन व बसवेश्वर चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष महेश(दादा) शावरी यांनी आपल्या कार्याने समाजात नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळेच ते सध्या मैंदर्गी शहरातील युवकांच्या गळ्यातील ताईत, तथा आयकॉन बनले आहेत. महेशदादांनी मैंदर्गीच्या राजकारणात आणि समाजकारणात वेगळाच ठसा उमटविला आहे. मैंदर्गी शहरात पूर्वी उद्योग व्यवसायाला भरभराटी आली होती. मात्र सध्या ही परिस्थिती बदलली आहे. मैंदर्गीला गतवैभव मिळवून देण्यासाठी आणि मैंदर्गीचा चेहरामोहरा बदलण्यासाठी महेशदादा हे एम. एस. युथ फाऊंडेशन व बसवेश्वर ट्रस्टच्या माध्यमातून अहोरात्र झटत आहेत. महेशदादा हे सुसंस्कृत आणि उच्च शिक्षित आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण मैंदर्गी येथील जिल्हा परिषद कन्नड शाळेत तर माध्यमिक शिक्षण शिवचलेश्वर प्रशालेत तसेच उच्च माध्यमिक शिक्षण सोलापुरातील वालचंद महाविद्यालयात झाले आहे.व अभियांत्रिकी शिक्षण पंढरपूर येथे झाले आहे, पुढे त्यांनी पुण्यातील एका नामवंत कंपनीत नोकरी केली. दरम्यान या कंपनीच्या माध्यमातून त्यांना परदेशवारीचा योग आला. सिंगापुरातील जागतिक स्वीस बँकेत वरिष्ठ अधिकारी म्हणून अकरा वर्षे त्यांनी सेवा बजावली.

महेशदादांच्या कुटुंबांना राजकीय पार्श्वभूमी आहे. त्यांचे चुलत आजोबा व माजी नगराध्यक्ष, स्व.सी.एफ.



शावरी हे राजकारणात होते. स्व. पुनप्पा शावरी व वडील बसवराज शावरी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महेशदादा हे समाजकारण आणि राजकारणात सक्रिय आहेत.समाज सेवेची प्रचंड आवड असणाऱ्या महेशदादा शावरींनी त्यांच्या एम. एस. युथ फाऊंडेशन व बसवेश्वर चॅरिटेबल ट्रस्टद्वारे दिनदुबळ्या, गरजू व गरिबांना सढळ हाताने मदत केली आहे. त्यांनी कित्येक गोरगरिबांना ऐन अडचणीच्या वेळी मदत केली आहे.त्यांच्या सामाजिक कार्याचा आवाका दिवसेंदिवस वाढत आहे.

शैक्षणिक क्षेत्रात क्रांती व्हावी म्हणून बसवेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट व एम. एस. यूथ फाउंडेशनची स्थापना केली आहे.सिंगापूर येथे राहून सामाजिक जाण व माणुसकीचे नाते जपले आहे आणि विशेष म्हणजे सिंगापूर येथे राहून मैंदर्गीतील प्रत्येक घडामोडींवर बारीक लक्ष असून अडीअडचणीच्या वेळी तत्काळ त्यांच्याकडून विनासायास मदत केली जाते. या माध्यमातून सार्वजनिक गणेशोत्सव, शिव-बसव जयंती, ग्रामदैवत महादेव व शिवचलेश्वर यात्रा पालखी महोत्सवाच्यावेळी महाप्रसादाचे वाटप, वाढपी महिलांना मोफत साडी वाटप, तसेच महेशदादा शावरी व त्यांचे धर्मपत्नी जीवन ज्योती प्रतिष्ठानचे अध्यक्षा राणीताई महेश शावरी यांच्या माध्यमातून हजारो सुहासिनींना ओटी भरणी कार्यक्रम, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता उपक्रम, शैक्षणिक साहित्य वाटप, गरीब शेतकऱ्यांच्या कन्येचे विवाहास भरीव मदत करणे.माळी समाजातील मंगल कार्यालय बांधकामासाठी



आर्थिक मदत, गरीब हुशार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून शिष्यवृत्ती देणे, हलाकीचे जीवन जगत असलेल्यांना ट्रस्टद्वारे मोफत वैद्यकीय उपचार देणे, रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन, शेतकऱ्यांना शेतीविषक मोलाचे मार्गदर्शन व जनावरांसाठी मोफत लसीकरण, समाजातील कार्यरत व निवृत्त विद्वानांचा सत्कार, विविध क्षेत्रातील अग्रगण्य माहितीचा सत्कार करून प्रोत्साहन देणे, मोफत अन्नधान्य वाटप करणे, क्रीडापटूंना क्रीडा विषयक सामुग्री वाटप करणे, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे, गुणवान व होतकरू विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक व करिअर संदर्भात योग्य मार्गदर्शन करणे,व मैंदर्गीतील मुलांना अंगणवाडीची उणीव जाणवत होती. ती उणीव भरून काढण्यासाठी महेशदादांनी स्व:खर्चाने अंगणवाडी शाळा सुरू केली आहे. तसेच मैंदर्गी मड्डी वस्तीतील लोकांच्या मागणीला होकार देऊन एम.एस. युथ फाउंडेशन कडून मड्डी वस्तीतील महादेव मंदीर समोर सिमेंटच्या खुर्च्या (बाकडे) बसवण्यात आले. दरवर्षी एम एस युथ फाऊंडेशन, मैंदर्गीच्या वतीने नगरपालिका चौक, मैंदर्गी येथे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते. संगमेश्वर गल्ली, विणकर वसाहत येथील नागरिकांना पाण्याची टंचाई भासत असल्याची माहिती तेथील नागरिकांनी महेशदादांना दिल्यावर त्यावर कायम स्वरुपी उपाययोजना म्हणून महेशदादांनी श्री संगमेश्वर मंदिरासमोर स्वखर्चातून बोअर मारुन तेथील पाणीटंचाई दूर केली. ओटी हे सौभाग्याचे प्रतीक समजून खास करून दरवर्षी नवरात्र उत्सव काळात देवीची ओटी भरण्यासाठी अनेक सुहासिनी मंदिरात येत असतात. त्याच प्रमाणे देवी आराधना करणाऱ्या सुहासिनींना पण ओटीचा मान मिळावा म्हणून त्या सर्वांना महेशदादा शावरी व त्यांचे धर्मपत्नी जीवन ज्योती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा राणीताई महेश शावरी यांच्याकडून साडी, चोळी व ओटीचे साहित्य देऊन मंगलमय व भक्तिमय वातावरणात सर्वांना ओटी भरून त्यांचा आशीर्वाद घेतला जातो. इत्यादी अगणित अशी सामाजिक कार्य त्यांच्या कडून अविरत घडत आहेत.

त्यांच्या या सामाजिक कार्याच्या शैलीमुळे भारावलेल्या युवक त्यांच्याकडे आकृष्ट झालेला आहे. आपल्या गावाविषयी त्यांना सदैव तळमळ आहे. यामुळेच त्यांचे कार्य झपाट्याने वाढत आहे.त्याच बरोबर



मैंदर्गी विविध विकास सोसायटीच्या गेल्या निवडणुकीत शेतकरी पॅनलमध्ये एक हाती सत्ता मिळविली.

या निवडणुकीतील विजयामुळे महेशदादांचा राजकीय दबदबा वाढला आहे. दरम्यान आता राजकारणातून समाजकारण हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून महेशदादा कार्य करीत आहेत. मैंदर्गी नगरपरिषदेवर असलेल्या ७० वर्षांची शावरी, गोब्बूर व लुकडे गट व शाब्दी गटाची सत्ता कायम ठेवून विकासकामाला आणखी गती देण्याची मनीषा महेशदादांची आहे, मैंदर्गी नगरीत आता लघु व कुटीर उद्योगाची प्रचंड गरज असून त्याद्वारे मैंदर्गी ची गेलेली गतवैभव परत प्राप्त करता येऊ शकते. गरज आहे ती प्रचंड राजकीय इच्छा शक्तीची आणि ही गरज श्री महेशदादा शावरी पूर्णत्वास नेतिल यास दुमत नाही. साहजिकच युवा वर्गांच्या त्यांच्या विषयी आशा वाढल्या असून मैंदर्गीच्या राजकारणात उतरून त्यांनी कारभार हाती घ्यावे व मैंदर्गीस गतवैभव प्राप्त करून द्यावे अशी गळ समस्त मैंदर्गी युवावर्ग व तसेच नागरिकांकडून घातली जात आहे. तरुणाईमध्ये झपाट्याने लोकप्रिय ठरत असलेल्या महेशदादांचा आज वाढदिवस. वाढदिवसानिमित्त महेशदादांना आभाळभर शुभेच्छा! व पुढील सामाजिक, राजकीय वाटचालीस अनेक शुभेच्छा.

-रविकांत धनशेट्टी
अक्कलकोट(९७६५०६३७५३)

# किरण देशमुख युवा मोर्चाचे अध्यक्ष; विजया वड्डेपल्लींकडे महिला मोर्चा

## शहर भाजपाची तब्बल १२३ जणांची कार्यकारिणी जाहीर

## उपाध्यक्षपदी बनशेट्टी, जाधव, केंगनाळकरांसह १० जणांची वर्णी

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहर भारतीय जनता पार्टीची शहर कार्यकारिणीची तब्बल दीड महिन्यानंतर शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी शुक्रवारी घोषणा केली. यामध्ये १० उपाध्यक्ष, ४ सरचिटणीस, १० चिटणीस, एक कोषाध्यक्ष, एक कार्यालय प्रभारी, एक प्रसिध्दी प्रमुख, ६२ कार्यकारिणी सदस्य, २१ विविध आघाडी व सेल प्रमुख, ६ मंड? अध्यक्ष, ६ विविध मोर्चाचे अध्यक्ष यांचा समावेश आहे. शहर भारतीय जनता युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी आमदारपुत्र व मा. नगरसेवक डॉ. किरण देशमुख तर महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी विजया वड्डेपल्ली यांची वर्णी लावण्यात आली आहे. नव्याने जाहीर करण्यात आलेले पदाधिकारी व कार्यकारिण सदस्य याप्रमाणे.**








उपाध्यक्ष : शोभाताई बनशेट्टी, श्रीनिवास करली, अनंत जाधव, प्रशांत फत्तेपुरकर, जय साळुंखे, श्रीनिवास दायमा, भूपती कमटम, प्रवीण दर्गो-पाटील, सोमनाथ केंगनाळकर, अश्विनी चव्हाण.

भाजप कार्यकारिणी पुढीलप्रमाणे- उपाध्यक्ष- शोभा बनशेट्टी, सोमनाथ केंगनाळकर, श्रीनिवास करली, अनंत जाधव, प्रशांत फत्तेपुरकर, जय साळुंखे, श्रीनिवास दायमा, भूपती कमटम, प्रवीण दर्गो-पाटील, सोमनाथ केंगनाळकर, अश्विनी चव्हाण, .

सरचिटणीस : पांडुरंग दिड्डी, रोहिणी तडवळकर, प्रा. डॉ. नारायण बनसोडे, विशाल गायकवाड. चिटणीस : मल्लिकार्जुन गोडगाव, सिद्धलिंग मसुती, सुधाकर नराल, नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, सुरेश पुप्पल, दत्ता वडगु, शेखर फंड संपदा जोशी सावित्री पलाट्टी, कोषाध्यक्ष- चंद्रकांत तापडिया. कार्यालय प्रभारी अनिल कंदलगी, प्रसिद्धी प्रमुख- विठ्ठल बडगंची.

शहर उत्तर पूर्व मंडल अध्यक्ष : प्रथमेश आनंदकर, शहर उत्तर पश्चिम मंडल अध्यक्ष : देविदास बनसोडे, शहर मध्य पूर्व मंडल अध्यक्ष : गिरीश बत्तुल, शहर मध्य पश्चिम मंडल अध्यक्ष : संतोष कदम, शहर दक्षिण पूर्व मंडल अध्यक्ष : अर्जुन जाधव, शहर दक्षिण पश्चिम मंडल अध्यक्ष : आनंद बिराजदार

युवा मोर्चा अध्यक्ष : डॉ. किरण देशमुख, महिला मोर्चा अध्यक्षा : विजया वड्डेपल्ली, ओबीसी मोर्चा अध्यक्ष : राम वाकसे, किसान मोर्चा अध्ळक्ष : वैभव बिराजदार, अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष : मारेप्पा कंपली, अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्ष : जाकीर मौलाली सगरी.

कार्यकारिणी सदस्य : शशिकला बत्तुल, इंदिरा कुडक्याल, संगीता जाधव, तुळशीदास भुतडा, अशोक गडहिरे, ॲड. चंद्रकांत सावंत, दत्तात्रय नडगिरे, दैदिप्य वडापूरकर, मधुकर वडनाल, राजाभाऊ अल्कोड, प्रभाकर कुलकर्णी, ॲड. रजाकभाई शेख, रणजित दवेवाले, डॉ. रफिक सय्यद, राजेश दिड्डी, शिवराज पवार, नागनाथ सोमार, श्रीधर गोखले, बाशा शेख, राधिका पोसा, शालन शिंदे, राजेंद्र पुजारी, अविनाश बोमड्याल, राजेश अनगिरे, उमेश डोईजोडे, लक्ष्मी भवानी, वंदना गायकवाड, सुरेखा काकडे, सोनाली मुटकिरी, संजीव कुलकर्णी, गुलजार शिवसिंगवाले, मोहन क्षीरसागर, रवी नादरगी, मंगल पाताळे, अनिता कोंडी, वरलक्ष्मी पुरुड, रामेश्वरी बिर्रु, मेनका राठोड, अश्विनी चव्हाण, राजश्री पाटील, मनीषा हुच्चे, जयश्री धप्पाधुळे, अनुसया कुरापाटी, रुचिरा मासम, शशिकला सिंगम, सावित्रीबाई फुलारी, सविता जोशी, लक्ष्मी नडगिरी, नम्रता हारे, रजनी शर्मा, सरोजनी मुलिंटी, भाग्यलक्ष्मी म्हंता, अशोक भोयनाल, नवनाथ जाधव, विठ्ठल दावत, धनराज आनंदाणी, भीमा आसादे, संतोष कुंदूर, नागेश पल्ली, अंबादास लोकुर्ती, साधना माळवदकर.

संघटन सरचिटणीस कोण?

भाजपात संघटन सरचिटणीस हे एक महत्वाचे पद मानले जाते. त्यांच्या दिमतीला तीन सरचिटणीस असताता. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या पदावर जय साळुंके यांची वर्णी लागणार होती. पक्षाच्या सूत्रानुसार संघटन सरचिटणीस आणि सरचिटणीस यांना आगामी मनपा निवडणुकीत मनपा निवडणुकीचे तिकीट दिले जाणार नाही. त्यामुळे सरचिटणीस पदावर येण्यास अनेकांना नकारघंटा दर्शविली होती. आता नियुक्त करण्यात आलेल्या चार सरचिटणीसांपैकी पांडुरंग दिड्डी किंवा रोहिणी तडवळकर यांच्या गळ्यात सरचिटणीसपद देण्याची शक्यता आहे.



## इंडियन मॉडेल स्कूल बॅडमिंटन स्पर्धेत उपविजयी

**सोलापूर** : जिल्हा कीडा अधिकारी कार्यालय व सोलापूर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शहरस्तरीय आंतरशालेय बॅडमिंटन १४ वर्षाखालील मुलींचा अंतिम सामना इंडियन मॉडेल स्कूल (सी.बी.एस.ई) विरुद्ध KLE स्कूल या दोन्ही संघामध्ये झाला. या सामन्यात इंडियन मॉडेल स्कूल (सी.बी.एस.ई) संघ उपविजयी ठरला. या स्पर्धा जिल्हा कीडा संकुल कुमठा नाका येथे पार पडल्या. मुलींच्या संघात आपूर्वा कोरे, आर्या पावर्गी, मधुरा जोशी, नमिता आर्वी व नूर अतनुरकर या खेळाडूंचा समावेश होता. यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी , मुयाध्यापिका अपर्णा कुलकर्णी , अचला राचर्ला, व सौ. ममता बसवंती यांनी अभिनंदन केले. या संघास कीडा शिक्षक एन.आय.एस बॅडमिंटन प्रशिक्षक सचिन ढवाण व राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले.

## लोकसभा समन्वयक अमर साबळे आज घेणार बैठक



**सोलापूर** : आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी भाजपचे सोलापूर लोकसभा समन्वयक अमर साबळे शुक्रवारी सोलापुरात येत आहे. साबळे यांच्या उपस्थितीत भाजपच्या महिला अध्यक्ष, युवा अध्यक्षांसह सर्व मोर्चातील पदाधिकाऱ्यांची बैठक होईल, असे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी सांगितले. भाजपचा लोकसभा निवडणुकीतील उमेदवार कोण याबद्दल सर्वांनाच उत्सुकता आहे. राज्यसभेचे माजी खासदार अमर साबळे यांनी मागील निवडणुकीत या मतदारसंघातून तयारी केली होती. मात्र पक्षाने त्यांना उमेदवारी नाकारल्याचे सांगण्यात आले. अजूनही सोलापूरचा उमेदवार कोण हे निश्चित झालेले नाही. मात्र पक्षाने मागील महिन्यात अमर साबळे यांच्यावर सोलापूर समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविली. साबळे शनिवारी सकाळी सोलापुरात येत आहेत. कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत निवडणुकीचा आढावा घेणारी बैठक होईल. बूथ यंत्रणा, भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने सोपविलेली जबाबदारी याचा आढावा घेण्यात येईल. शहर आणि ग्रामीण भागातील कार्यकर्ते आढावा सादर करतील, असेही काळे यांनी सांगितले.

## रेल्वेच्या खिडकीतून महिलेच्या मंगळसूत्र हिसकावून नेले

**सोलापूर** : रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेच्या गळयातील ३० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरट्याने खिडकीतून हात घालून हिसका देऊन चोरून नेले. ही घटना दि. ९ रोजी हुसेनसागर एक्सप्रेस मध्ये पोफळज रेल्वे स्टेशन येण्यापूर्वी घडली.याबाबत चंद्रकला मल्लिकार्जुन स्वामी (रा. गुलबर्गा) यांनी कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. चंद्रकला स्वामी हे आपल्या आई वडिलांना भेटण्याकरिता आपल्या पती व लहानमुलासह हुसेनसागर एक्सप्रेसच्या बोगी नं एस १ मधील बर्थ क्र.६३ वरुन पुण्याकडे जात असताना पोफळज येण्यापूर्वी रा. १० .४५ वा सुमारास गाडी थांबली असता अंधाराचा फायदा घेऊन चोरट्याने उघड्या खिडकीतून हात घालत फिर्यादी चंद्रकला स्वामी यांच्या गळयातील ३० हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र ओढून तोडून नेले.

## नेहरू वसतिगृहाच्या खाजगीकरणास युवासेनेचा विरोध

**सोलापूर** : जवाहरलाल नेहरू वसतिगृह जिल्ह्यातील खेड्यापाड्यात राहणाऱ्या गरीब,गरजू कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी एक महत्त्वाचे ठिकाण आहे.शाळा कॉलेज सुरू होऊन दोन ते अडीच महिने उलटून गेले.अद्याप वसतिगृह सुरू झाले नाही त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे वस्तीगृह तात्काळ चालू करावे या वस्तीगृहाचे खाजगीकरण करू नये अशी मागणी युवासेनेच्या वतीने करण्यात आली आहे. शहर जिल्ह्यातील अनेक राजकीय सामाजिक संघटनांनी निवेदन देऊन आजवर प्रशासनास मागणी केली आहे. तरी सदर निवेदनास कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. खासगी करणास युवा सेनेचा विरोध आहे. जर खाजगीकरण झाल्यास युवा सेनेच्या वती तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाप्रमुख सागर शितोळे यांनी दिला आहे. यावेळी उपशहरप्रमुख समर्थ मोटे, किशोर चव्हाण, युवासेना उपशहरप्रमुख पद्मसिंह शिंदे, प्रवीण माने, निलेश कुंभार, आकाश हंगरगी, यासिन शेख, शिवानंद बिराजदार, खंडेराव कोरे, सिद्धाराम हंगरगी उपस्थित होते.

# हिंसक जमावावर पाण्याचा फवारा, अश्रुधूर, लाठीचार्ज आणि गोळीबारही

## आसरा चौकात पोलिसांचा 'मॉक ड्रील'

सुराज्य/सोलापूर



वेळ दुपारी ४.३०... स्थळ आसरा चौक... जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांची प्रचंड वर्दळ... किल्लेदार मंगल कार्यालाकडून आसरा चौकाकडे येणाऱ्या रस्त्यावर राज्य राखीव दलाचे पोलीस... अश्रूधूर सोडणारे पोलीस, लाठीचार्ज करणारे पोलीस दबा धरुन उभे असलेले... बाजूलाच पाण्याचा फवारा मारणार पाण्याचा बंब... रुग्वाहिका असा लवाजमा... इतक्याच कुणाला कशाचाही मागमूस नसताना ५० ते ६० जणांचा घोळका हातात दगड आणि काठ्या घेऊन चौकात पळत आलेला... विविध आक्रमक घोषणांनी परिसर त्यांनी दणाणून सोडलेला... आणि पुढे घडले ते वेगळेच.

जमाव संतप्त झालेला आसरा चौकात नागरिकांवर व पोलिसांवर हल्ला करण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी पाण्याच्या बंबातून जमावावर फवारा मारण्यास सुरुवात केली. पाचते आठ मिनिटे हा पाण्यात थरार सुरु होता. तरीही जमाव काबूत येत नसल्याने पोलिसांनी अश्रुधूराच्या नळकांड्या सोडल्या. यामुळे जमाव चौकात ठाण मांडून बसलेला. तेवढ्यात राज्य राखीव पोलीस दलाची एक तुकडी पुढे आली आणि जमाव पांगवण्यासाठी त्यांच्यावर लाठीचार्ज सुरु केला. यातील काहीजणांची पळापळ झाली. जमाव थोडा पांगला. तरीही निम्मा जमाव आक्रमणासाठी पुढे आलेलाच. तेवढ्यात वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आदेशानुसार पोलिसांनी जमावाच्या दिशेने गोळीबार सुरु केला. यामध्ये दोन दंगेखोर जखमी झाली. बाकी जमावाची पांगापांग झाली. जखमी दंगेखोरांना स्ट्रेचरवर झोपवून रुग्णालयाकडे पाठविण्यात आले. पोलिसांनी टप्प्याटप्प्याने दंगेखोरांवर कारवाईचे हत्यार उपसल्याने दंगेखोरांकडून पुढे होणाऱ्या हिंसक वळणावर पायबंद बसला गेला आणि पोलिसांनी एकच सुस्कारा सोडला.

... हा होता पोलिसांनी ॲक्शन प्लॅन. सणासुदीच्या आणि उत्सवाच्या काळात कधी, कुठे समाजकंटक दंगा करण्याच्या हेतूने पुढे आले तर त्यांच्यावर नियंत्रण कसे आणायचे याची जणू प्रॅक्टीसची पोलीस आणि राज्य राखीव दलाच्या जवानांनी आसरा चौकात केली. दंगा नियंत्रण विरोधी पथकाचे हे एक 'मॉक ड्रील' होते. आसरा चौकात याची कुणालाच कसलीची खबरबात नव्हती. जा-ये करणारे सुजाण नागरिक खरच दंगल होत आहे की काय?, या भितीने धास्तावलेले दिसून आले. पण नंतर हे एक पोलिसांनी आपल्याच सुरक्षेसाठी खेळलेली एक चाल म्हणजे मॉक ड्रील होते, हे नंतर नागरिकांच्या लक्षात आले.

यावेळी विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिंदे, एपीपी मोरे, एपीआय जाधव, पीएसआय दाहिंगे, बारावकर, गायकवाड आदी पोलीस अधिकारी, विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलीस, राज्य राखीव पोलीस दलाचे जवाण आदींनी सहभाग घेतला.



# प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध : किसन जाधव

सुराज्य/सोलापूर

प्रभागाच्या विकासासाठी अतिदुर्गम भागात दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेवून नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात विकासासाठी कुठलेही राजकारणाकरता प्रभागाचा विकास हाच आपला ध्यास हे मनी बाळगून प्रभाग क्रमांक २२ चा आपण कायापालट केल्याचे असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी गटनेते किसन जाधव यांनी व्यक्त केले.

प्रभाग क्रमांक २२ येथील विजापूर नाका झोपडपट्टी क्रमांक दोन मधील यतीमखाना पाठीमागील परिसरातील विकास कामांच्या शुभारंभ करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, आदित्य जाधव, इरफान शेख, मुसरींब शेख, सादिक ताजमल, प्रशांत माळेकर, मुनीर शिलेदार अभिजीत मराठे, नाशीर शेख ,राहुल मळेकर, अल्ताफ शेख,किरण भोसले तानाजी जाधव, सागर पाचपुते, सागर समोसे,जमेला अफा शेख, मालन अफा बेग, बबीता डोलारे, लता गायकवाड, राजश्री मराठे, हसीना अफा शेख, रोशन अफा शेख, अर्चना समोसे, जयश्री राऊत,वसंत कांबळे, माणिक कांबळे, महादेव राठोड उपस्थित होते.

# सणासुदीत आक्षेपार्ह पोस्टवर राहणार 'सायबर'ची करडी नजर

सुराज्य/सोलापूर

आगामी काळ हा सणासुदीचा आहे. गौरी-गणपती, गणेशोत्सव, ईद ए मिलाद असा हिंदू-मुस्लिम बांधवांचा उत्सव आहे. या काळात शांतता-सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी सर्व समाजातील बांधवांनी सोशल मीडियावर आक्षेपार्ह चित्र अथवा पोस्ट टाकू नये, यावर सायबर पोलिस यंत्रणा करडी नजर ठेवून आहे. अशा कृती आढळून आल्यास थेट कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

गणेशोत्सवाचे औचित्य साधून महिनाभरापासून सर्वच मंडळांचे कार्यकर्ते, पदाधिकारी जोरदार तयारीत आहेत. लेझीम, झांज, टिपऱ्य, देखावे अशा कार्यक्रमांमध्ये व्यस्त आहेत. याच काळात गौरी आवाहनही आहे. बाजारपेठेत रेलचेल सुरू आहे. ईद ए मिलाद हासुद्धा याच काळात आहे. अशावेळी कोणाच्या भावना दुखावणार नाही असे कृत्य कोणीही करू नये. उत्साहाच्या भरात उचलले जाणारे एखादे पाऊल धार्मिक तेढ निर्माण करणारे ठरू नये, यासाठी येत्या ३० सप्टेंबरपर्यंत कोणीही आक्षेपार्ह चित्र किंवा चलचित्र सोशल मीडियावर पोस्ट करणार नाही, व्हॉट्सप स्टेट्स ठेवणार नाही किंवा एकमेकांना शेअर करणार नाही. त्यामुळे सामाजिक सलोखा बिघडला जाणार नाही. जर असे काही आढळून आल्यास पोलिस कारवाई करेल, असे पोलिस निरीक्षक श्रीशैल गज्जा यांनी सांगितले.

# पारायणाने मनात पवित्र भाव निर्माण होतो : आ.देशमुख

## आनंदनगरच्या श्रीदत्त मंदिरात गुरूचरित्र पारायणाची सांगता

सुराज्य/सोलापूर



पारायण केल्याने परमेश्वर भेटतो की, नाही हे मला माहित नाही. पण पारायण केल्याने पवित्र भाव आपल्या मनामध्ये निर्माण होतो,असे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी केले

भंडारकवठेजवळच्या आनंद नगरमधील श्री दत्त मंदिरात साधना-कुटी सत्संग मंडळाच्या वतीने श्रावण मासाचे औचित्य साधून विजय बिज्जरगी यांनी पूर्ण महिनाभर श्री. गुरु दत्त चरित्रग्रंथाचे पारायण केले.त्याची समाप्ती गुरूवारी करण्यात आली. त्याप्रसंगी आ.देशमुख बोलत होते. बिज्जरगी हे भंडारकवठे व पंचक्रोशीतील लोकांमध्ये करीत असलेले धार्मिक कार्य कौतुकास्पद आहे. त्यांच्या या धार्मिक कार्यक्रमाबरोबर प.पू. श्री. सिद्धेश्वर स्वामीजी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांनी केलेले वृक्ष लागवड व संबर्धन कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यांची प्रेरणा घेऊन आपण प्रत्येकांनी एक-एक वृक्षाची लागवड करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

श्रावणमासानिमित्त आयोजित पारायण समाप्ती कार्यक्रमासाठी तेलगाव, विंचूर, हत्ताळी, बाळगी, सादेपूर, या गावातील पाच प्रमुख दिंडींचे आयोजन या प्रसंगी करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प.पू.श.प्र.षडाक्षरी महास्वामीजी चडचण व प.पू.श्री. भरतमुनी महाराज बसवनगर, प.पू.श्री.लिंगानंद शास्त्रीजी कुंभारी यांचे दिव्य सानिध्य लाभले होते. तर भंडारकवठेचे नूतन सरपंच भीमाशंकर बबलेश्वर व किरण पुजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

साधना-कुटी भंडारकवठे ते श्री. दत्त मंदिर आनंदनगरपर्यंत सुवासिनींनी जलकुंभ मिरवणूक काढली.त्यानंतर औदुंबर वृक्ष जलार्पण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी आनंदराव कोल्हे, गंगाधर पाटील,व्ही.के. पाटील,यतीन शहा, भीमराव कुलकर्णी,हणमंत पुजारी, गणपती शेजाळ, सुरेश फडतरे, शेकप्पा बीरसुर, श्रीशैल बुगडे, सिदराळे हत्ताळी, रेवणप्पा मुक्काणे, आप्पासाहेब बबलेश्वर आदी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यगोपाल जंगलगी परिवाराच्या वतीने प्रसाद वाटप करण्यात आले. प्रस्तावना विजय बिजरगी यांनी केली तर सूत्रसंचालन पी.जी.हडपद यांनी केले.

**विवेकानंद प्रतिष्ठानचा उपक्रम**

# रद्दीतून शिक्षण अंतर्गत शिष्यवृत्ती वितरण सोहळा

सुराज्य/अक्कलकोट




अभियंता दिनाचे औचित्य साधून विवेकानंद प्रतिष्ठान अक्कलकोट च्या वतीने श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलित कै. कल्याणराव इंगळे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना रद्दीतून शिक्षण या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा आ.सचिन कल्याणशेट्टी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे , भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड व प्राचार्य नागनाथ जेऊरे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन संपूर्ण झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य जेऊरे सर यांनी केले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश वितरित करण्यात आले. त्यावेळी प्रत्येकी १० हजार असे एकूण ११ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आले. अशोक येणगुरे यांनी विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. यावेळी मनीषा आव्हाळे यांनी रद्दीतून शिक्षण ही अत्यंत कल्पक योजना असून त्याची उत्तम अंमलबजावणी यावर समाधान व्यक्त केले. आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी उपस्थितांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे शिक्षण घेऊन राष्ट्रबांधणीच्या कार्याला हातभार लावावा व पंतप्रधान मोदी यांच्या भारताच्या आर्थिक महासत्ता बनवण्याच्या प्रयत्नांना बळ द्यावे असे आवाहन केले. तसेच सर्व रद्दीदात्याचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी शिवानी नंदकुमार भोसले या विद्यार्थिनीने कवितेच्या माध्यमातून उपस्थितांना इंजीनियरिंग विद्यार्थ्यांचे कष्ट व त्यांचे आयुष्य याबद्दल प्रभावीपणे आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून विवेकानंद परिवारचे आभार मानले.

यावेळी विवेकानंद परिवाराचे सदस्य मल्लिकार्जुन मसुती, विलास कोरे, महेश कापसे, मल्लिनाथ मजगे, अमोल कोकाटे, विजय तडकलकर गजानन पाटील, डॉ. बसवराज नंदीकोले, राजकुमार झिंगाडे, स्वप्निल पुकाळे, चंद्रकांत दसले, धनंजय गाढवे, नागेश कलशेट्टी, गीत पवार व परिसरातील पालक, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.काशिनाथ घुरघुरे व आभार विभाग प्रमुख प्रा.वैजनाथ खिलारी यांनी मानले.